दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक २३४ | रविवार ७ जून २०२६
| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'
भाग ७४

## कुंडलिनी...

कुंडलिनी, ही तुमची अतिपवित्र अशी आई आहे, आणि ती प्रत्येकाजवळ आहे. तिला तुम्ही मलीन नाही करू शकत. ती अत्यंत पवित्र, अशी तुमची शुद्ध इच्छा, बाकी सर्व तुमच्या इच्छा विकृत होतात. पण ती शुद्ध इच्छा, परमेश्वराला मिळवण्याची जी शुद्ध इच्छा आहे, ती कुठे सारखी नसते आणि म्हणून तिला म्हणतात, ती सुप्तावस्थेत आहे. कारण अजून तिचं जागरण झालेलं नाही आणि ते जागरण तेव्हाच होऊ शकेल, जेव्हा त्या कुंडलिनीला हे कळेल की समोर, कुणी तरी अशी व्यक्ती आहे, जी त्या कुंडलिनीच्या कार्याला जाणते. आता आमच्यामुळे म्हणा किंवा इतर सहजयोग्यांच्यामुळे, इतर पुष्कळ लोक पार झाले. त्यातले काही लोक इथे आले आणि बरेच सहजयोगी लोकांनी इथे येऊन, एवढं मोठं – इथे बरंच कार्य सुरू केलेलं आहे. आता असंच मल्हारपेठेत, मग पुढे असं वाढत-वाढत, हे सहयोगाचं कार्य सगळीकडे पसरलं पाहिजे आणि हे पसरणारच. कारण ह्याबद्दल पूर्वी हजारो वर्षापूर्वी भाकीत झालेलं आहे. हे भाकीत म्हणजे आपल्याला आश्चर्य वाटतं, की भृगुंनी, हज्जारो वर्षांपूर्वी, सोळा-सतरा हज्जार वर्षांपूर्वी म्हणतात लिहून दिलं आहे. आता त्यांचे किती हजार वर्षं झाले, त्याबद्दल वाद घालण्यापेक्षा असे त्यांनी पुष्कळ जुनं, नाडीग्रंथामध्ये लिहून दिलेलं आहे, की १९७० सालापासनं हे कार्य सुरू होणार आहे. आणि सहजयोग हा १९७० सालापासनं सुरू झाला आणि त्यात सहजच अशी कुंडलिनी जागृत होऊन, आणखी सगळ्यांना हे परमेश्वराचे जे ज्ञान आहे, ते मिळणार आहे. ३०/१२/१९८२ मल्हारपेठ,कोल्हापूर अधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# जंतर-मंतरवर 'कॉकरोच जनता पार्टी'चा गजर!

## धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्यासाठी ५ दिवसांचा अल्टिमेटम; सोनम वांगचुकांचा सहभाग, विरोधकांचाही पाठिंबा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** नीट व इतर स्पर्धा परीक्षांमधील कथित गैरव्यवहारांच्या मुद्द्यावरून 'कॉकरोच जनता पार्टी'ने (सीजेपी) शनिवारी दिल्लीतील जंतर-मंतर येथे मोठे आंदोलन छेडत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. आंदोलनासाठी देशभरातून विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा देणारे तरुण आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी दिल्लीत दाखल झाले होते.

अभिजीत दिपके यांनी धर्मेंद्र प्रधान यांनी पाच दिवसांत राजीनामा द्यावा, अन्यथा देशव्यापी आंदोलन उभारले जाईल, असा इशारा दिला. जंतर-मंतर येथे सकाळपासून मोठी गर्दी झाली होती. आंदोलकांनी नीट, सीबीएसई, सीयूईटी आणि विविध भरती परीक्षांतील कथित अनियमिततेबाबत संताप व्यक्त केला. या आंदोलनाला सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनीही उपस्थित राहून पाठिंबा दिला. दिल्ली पोलिसांनी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राजधानीत कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवली होती. विमानतळ, रेल्वे स्थानके, बसस्थानके आणि संवेदनशील भागात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.दरम्यान, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आंदोलनाबाबत प्रतिक्रिया देताना तरुणांच्या भावना समजून घेण्याची गरज असल्याचे म्हटले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते रोहित पवार यांनीही या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे केंद्र सरकारने गांभीर्याने पाहावे, असे मत व्यक्त केले.

जंतर-मंतरवरील या आंदोलनामुळे देशातील परीक्षा व्यवस्था, तरुणांचा वाढता असंतोष आणि राजकीय प्रतिसाद यावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

### अराजकतेची मानसिकता

संविधान हातात घेऊन संविधानाने निर्माण केलेल्या संस्थांनाच नाकारणे योग्य नाही. युवांच्या अभिव्यक्तीपेक्षा अराजकतेची मानसिकता दिसून आली.

– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री



### 'सीजेपी'च्या प्रमुख मागण्या

- केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा
- परीक्षा व्यवस्थेतील कथित गैरव्यवहारांची चौकशी
- विद्यार्थ्यांसाठी पारदर्शक व उत्तरदायी यंत्रणा
- भरती व प्रवेश प्रक्रियेत सुधारणा




## महत्वाचे..



### केजरीवालांनी केली शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

नवी दिल्ली : आप'चे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनीही दिल्लीतील जंतर मंतर येथे झालेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'च्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. अशी आंदोलने तरुणांमधील प्रचंड संताप आणि निराशा दर्शवतात, असे मत व्यक्त करून केजरीवाल म्हणाले, शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे, मोदी सरकारने तरुणांच्या समस्या सोडवल्या पाहिजेत. कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन हे देशातील तरुणांच्या प्रचंड संताप आणि निराशेची अभिव्यक्ती आहे. त्यांना देशद्रोही ठरवण्याऐवजी मोदी सरकारने त्यांच्या समस्या सोडवल्या पाहिजेत. आम आदमी पार्टी त्यांच्या मागण्यांना पाठिंबा देते. पंतप्रधानांनी शिक्षणमंत्र्यांना तात्काळ बडतर्फ करावे, अशी मागणी केजरीवाल यांनी केली.

# कोपरगाव बाजार समितीत उपसभापतींसह सदस्यांचे सामूहिक राजीनामे

## पदापेक्षा शेतकऱ्यांचे हित व संस्थेची प्रतिष्ठा महत्त्वाची–उपसभापती परजणे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विद्यमान सभापतींकडून सुरू असलेला अनागोंदी कारभार, आर्थिक उधळपट्टी आणि शेतकरी हिताकडे होत असलेल्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ उपसभापतींसह काही सदस्यांनी सामूहिक राजीनामे दिले असल्याची माहिती विद्यमान उपसभापती गोवर्धन परजणे यांनी दिली आहे.

उपसभापती गोवर्धन परजणे यांनी म्हटले आहे की, कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकऱ्यांची कामधेनू आहे. आमचे नेते आमदार आशुतोषदादा काळे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी हित जोपासले जावे या उद्देशातून आमच्यावर जबाबदारी दिली होती. त्यामुळे शेतकऱ्यांची कामधेनू असलेल्या संस्थेचे हित जपणे हे आमचे प्राथमिक कर्तव्य आहे. मात्र काही म हिन्यांपासून बाजार समितीमध्ये उत्पन्नाचा विचार न करता मोठ्या प्रमाणावर अनावश्यक खर्च करण्यात येत असून आर्थिक शिस्त पूर्णपणे ढासळत चालली आहे.

सभापतींच्या सुरु असलेल्या सध्याच्या अनागोंदी कारभारामुळे संस्था आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर पोहोचण्याची भीती निर्माण झाली आहे. या पापाचे भागीदार होण्याची आमची अजिबात इच्छा नाही. आम्हाला पदापेक्षा शेतकऱ्यांचे हित आणि संस्थेची प्रतिष्ठा महत्वाची आहे.

मात्र हा प्रकार थांबण्याऐवजी याम ध्ये वाढ होत चालली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आणि बाजार समितीच्या भवितव्याशी खेळणाऱ्या या कारभाराला आम्ही समर्थन देऊ शकत नाही. संस्थेची अधोगती होत असतांना पदावर राहून मुकाट्याने पाहत बसणे हे शेतकरी बांधवांशी बेईमानी ठरेल. त्यामुळे संस्थेच्या हिताला बाधा पोहोचविणाऱ्या निर्णयांचा भाग होवून अशा चुकीच्या कारभाराचे भागीदार होण्यापेक्षा आम्ही स्वखुशीने राजीनामा देण्याचा कठोर पण तितकाच आवश्यक निर्णय घेतला तो फक्त आणि फक्त शेतकरी आणि संस्थेच्या हितासाठी घेतला आहे असे उपसभापती गोवर्धन परजणे यांनी स्पष्ट केले आहे. सभापती यांच्या कारभाराविरोधात विद्यमान उपसभापतींसह सदस्यांनी घेतलेल्या या भूमिकेमुळे बाजार समितीत मोठी खळबळ उडाली असून शेतकरी व व्यापारी वर्गातही या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

**शेतकऱ्यांच्या मालाला वाजवी दर देणारी हक्काची बाजारपेठ म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीकडे पाहिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी अधिकच्या चांगल्या उपाय योजना कशा पद्धतीने राबविल्या पाहिजे याचा प्रामुख्याने विचार होणे गरजेचे असतांना शेतकऱ्यांच्या हितासाठी आवश्यक असलेल्या योजनांवर खर्च करण्याऐवजी गरज नसलेल्या बाबींवर नको त्या ठिकाणी निधी खर्च केला जात आहे. त्यामुळे संस्थेच्या आर्थिक शिस्तीला बाधा पोहोचत असून संस्थेची आर्थिक घडी विस्कटण्याचा धोका निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांच्या आणि बाजार समितीच्या भवितव्याशी खेळण्याचा हा प्रकार असून यामध्ये सुधारणा होईल अशी आम्हाला अपेक्षा होती.**

# विषारी औषध घेतल्याने विद्यार्थिनीचा मुत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** तालुक्यातील गोंडेगाव येथील एका विद्यार्थिनीचा काहीतरी 'विषारी पदार्थ' पोटात गेल्याने विद्यार्थिनीचा उपचारदरम्यान मुत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती.



तिला आधी साखर कामगार रूग्णालयात नेण्यात आले. तिची प्रकृती चिंताजनक असल्याने तिला आहिल्यानगर येथे शासकीय रूग्णालयात दाखल आले. मात्र तिचा उपचार सुरू असताना प्राणज्योत मावळली. मावशीकडे न जाण्याच्या कारणावरून तिने मनात राग धरून हे शेवटचे पाऊल उचलल्याचे बोलले जाते. स्नेहल संजय तांबे (वय १३ ) असे मुत्यू झालेल्या विद्यार्थिनीचे नाव आहेत.

पीएमश्री जिल्हा परिषद शाळा सातवीच्या वर्गात शिक्षण घेत होती.कु.स्नेहलने नुकताच्या झालेल्या शाळा अतर्गत परिक्षेत उत्तीर्ण होऊन तिने तालुक्याबरोबरच जिल्ह्यात प्रथम पटकाविला.

तिची शासकीय महाविद्यालय टाकळी ढोकेश्वर ता.पारनेर येथे पुढील शिक्षणासाठी निवड झाल्याचे सांगण्यात आले.शाळेत अत्यंत हुशार आणि गुणवंत तसेच उत्कृष्ट खेळाडू विद्यार्थिनी म्हणून ओळख होती. तिच्या अकाली जन्याने तांबे कुंटूबावर दु:खाचा डोंगर कोसळला.तिने इतकेच शेवटचे पाऊल का उचलले? हे कारण मात्र समजू शकले नाही.

तिच्या मुत्यू पश्चात आई, वडील, भाऊ, तीन बहिणी, मोठा असा परिवार होता, तांबे कुटूंबात सर्वात धाकटी मुलगी होती. तिच्यावर शनिवारी सांयकाळी अमरधामात शोकाकुल वातावरणात अत्यसंस्कार करण्यात आले.

याप्रकरणी, तालुका पोलिसात ठाण्यात अकस्मात मुत्यू नोंद करण्यात आली असून पोलीस निरीक्षक अरूण धनवडे मार्गदर्शनाखाली अधिक तपास तालुका पोलीस करीत आहेत.

# देवस्थान इनाम निर्मूलन कायदा स्थगित

## सरकारचा युटर्न : महसूलमंत्री बावनकुळे यांची घोषणा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याला स्थगित देण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही घोषणा केली. या कायदा विरोधात अनेक देवस्थानच्या समितीने विरोध दर्शविला होता. तसेच हिंदुत्ववादी संघटनांकडूनही राज्यात अनेक ठिकाणी विरोध करण्यात आला होता. हिंदुत्व विचाराचे सरकार सत्तेत असतानाही असा कायदा का आणण्यात येत आहे, अशी ओरड सुरू होती. त्यानंतर आता हा कायदाच स्थगित करण्याची घोषणा सरकारने केली आहे.

राज्यातील देवस्थानांकडे, मंदिरांकडे अनेक जमीन आहेत. या मोठ्या भूखंडाविषयी सरकारने नुकताच मोठा निर्णय घेतला होता. इनामी जमीन रद्द करण्याचा प्रस्ताव सरकार समोर होता. मात्र आता देवस्थानांच्या जमिनीसाठी नवा कायदा आणला जाईल. नवा कायद्याच्या प्रारूपासाठी एक समिती स्थापन करण्यात येणार आहे. महसूल विभागाचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती असेल. त्यात दोन विभागीय आयुक्त, दोन जिल्हाधिकारी आणि मंदिर संस्थांचे १५ प्रतिनिधी असतील. नव्या कायद्याचा प्रारूपासाठी १५ ऑगस्ट पर्यंत सूचना आणि हरकती मागवण्यात येतील. १५ सप्टेंबरपर्यंत कायदा तयार करून हिवाळी अधिवेशनात सभागृहात हा कायदा आणण्यात येईल, असे बावनकुळे म्हणाले.

विधान परिषद निवडणुकीबाबत प्रतिक्रिया देताना ते म्हणाले, कुठल्याही निवडणुकीत आम्ही दबाव आणला नाही. आम्ही पेट्रोल डिझेलच्या संकटात अनावश्यक निवडणूक लढवू नका, असे आवाहन केले होते. एखाद्या पक्षाला प्रचंड बहुमत असताना अशा वेळेला कशाला निवडणूक लढवत पंधरा दिवस आचारसंहिता लांबवायची, काम थांबवायची असं आमचं मत होतं. या ठिकाणी काँग्रेसचा बहुमत राहिला असता, तर आम्ही पण उमेदवार मागे घेतला असता. मात्र बहुतांशी ठिकाणी आमच्या मतांच्या तुलनेत काँग्रेसची मतं कमी होती. म्हणून आम्ही काँग्रेस पक्षाच्या नेत्यांना आवाहन करत निवडणूक बिनविरोध करण्याची विनंती केली होती. मतदान नसताना काँग्रेसच्या (पान ४ वर)

### खा. सुप्रिया सुळे यांना विनंतीवजा इशारा



सुप्रियाताई माझी विनंती आहे, असे तुम्ही बोलू नका. ६५ वर्ष काँग्रेसने ज्या पद्धतीच्या बदमाशी केली आहे, तशा स्वरूपाच्या बदमाश्या आम्ही केलेल्या नाहीत. १००० गोष्टी आमच्याकडे आहे. त्या आम्हाला उघड करावे लागतील. ३५ वर्ष मी पण राजकारणात आहे. अनेक सरकार बघितले आहे, कृपया विनंती आहे म हाराष्ट्राला बदनाम करू नका.

# कॅरेक्टर खराब करण्याची धमकी देणारा हवालदार लाच घेताना जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**बीड :** बीड जिल्ह्यातील नेकनूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस अंमलदार दत्तात्रय बळवंत यांना १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात अटक केली. विशेष म्हणजे ही कारवाई थेट नेकनूर पोलीस ठाण्याच्या आवारातच करण्यात आल्याने पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका प्रकरणातील काम करून देण्यासाठी अंमलदार बळवंत यांनी तक्रारदाराकडे लाचेची मागणी केली होती. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर जालना एसीबीने पडताळणी केली. तक्रारीत तथ्य आढळून आल्यानंतर उपअधीक्षक बाळासाहेब जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचण्यात आला. त्यानुसार एसीबीच्या पथकाने नेकनूर पोलीस ठाण्याच्या परिसरात कारवाई करत बळवंत यांना १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले.

दत्तात्रय बळवंत हे यापूर्वीही वादग्रस्त ठरले होते. काही महिन्यांपूर्वी शेतीच्या वादातून एका शेतकऱ्याला तुझे कॅरेक्टर खराब करून टाकीन अशी धमकी दिल्याचा त्यांचा कथित व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या घटनेनंतर त्यांच्या (पान ४ वर)



# तरुणांचा उद्रेक आणि व्यवस्थेची कसोटी




**विशेष संपादकीय**
**करण नवले (संपादक)**

देशाच्या राजकारणात अनेक आंदोलने झाली, अनेक पक्ष उदयास आले आणि अनेक प्रश्नांवर जनतेने रस्त्यावर उतरून सत्ताधाऱ्यांना जाब विचारला. मात्र दिल्लीतील जंतर-मंतरवर नुकत्याच झालेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'च्या आंदोलनाने एक वेगळाच संकेत दिला आहे. हे आंदोलन केवळ एका पक्षाचे किंवा एखाद्या नेत्याचे नव्हते, तर देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या आणि स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुणांच्या मनात साचलेल्या असंतोषाचे प्रतीक म्हणून त्याकडे पाहिले जात आहे.

गेल्या काही वर्षांत नीट, भरती परीक्षा, प्रवेश प्रक्रिया आणि विविध स्पर्धा परीक्षांबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले. पेपरफुटी, गैरव्यवहार, निकालांबाबतचा संभ्रम, न्यायालयीन लढाया आणि त्यातून निर्माण होणारी अनिश्चितता यामुळे विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत झाला आहे. एका सामान्य कुटुंबातील विद्यार्थी अनेक वर्षे अभ्यास करतो, कोचिंगसाठी लाखो रुपये खर्च करतो, कुटुंबीय त्याच्याकडून मोठ्या अपेक्षा बाळगतात; मात्र परीक्षेच्या प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले तर त्याच्या मनातील संताप स्वाभाविक ठरतो.

'कॉकरोच जनता पार्टी' हे नाव अनेकांना विनोदी किंवा उपरोधिक वाटू शकते. पण या नावामागे व्यवस्थेच्या विरोधातील तीव्र नाराजी दडलेली आहे. व्यवस्थेतील त्रुटी, भ्रष्टाचार, अकार्यक्षमता आणि सामान्य माणसाच्या प्रश्नांकडे होणारे दुर्लक्ष यांविरोधात निर्माण झालेली ही प्रतिक्रिया आहे. म्हणूनच या आंदोलनाकडे देशभरातील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळताना दिसला. जंतर-मंतरवर जमा झालेली गर्दी केवळ राजकीय कार्यकर्त्यांची नव्हती, तर भविष्याबद्दल चिंतित असलेल्या तरुणांची होती.

या आंदोलनाला सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्यासारख्या व्यक्तींनी पाठिंबा दिला, तर विविध विरोधी पक्षांच्या नेत्यांनीही समर्थन व्यक्त केले. त्यामुळे या आंदोलनाला राजकीय परिमाण प्राप्त झाले. परंतु कोणत्याही आंदोलनाचे मूल्यांकन करताना त्यामागील मूळ कारणांकडे लक्ष देणे अधिक महत्त्वाचे असते. सरकारच्या धोरणांवर टीका करणाऱ्यांना विरोधक म्हणून हिणवणे आणि आंदोलनकर्त्यांना देशद्रोही किंवा अराजकवादी ठरवणे हा प्रश्न सोडवण्याचा मार्ग नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संविधानाच्या चौकटीत राहून अभिव्यक्त करण्याचा सल्ला देत आंदोलनामागे अराजकतेची मानसिकता असल्याची टीका केली. त्यांचे म्हणणे एका अर्थाने योग्यही आहे. कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत संस्थांवरचा विश्वास टिकून राहणे आवश्यक असते. परंतु त्याच वेळी त्या संस्थांनीही स्वतःची विश्वासार्हता सिद्ध करणे तितकेच महत्त्वाचे असते. जेव्हा लाखो विद्यार्थी रस्त्यावर उतरतात, तेव्हा त्यांच्या भावना केवळ राजकीय प्रेरणेने व्यक्त होत आहेत असे मानणे वास्तववादी ठरणार नाही.

भारतीय जनता पक्षाला सत्तेपर्यंत पोहोचवण्यात देशातील तरुण मतदारांचा मोठा वाटा होता. विकास, रोजगार, पारदर्शकता आणि संधींची समानता या आश्वासनांवर तरुणांनी विश्वास ठेवला. आज तोच तरुण वर्ग शिक्षण आणि रोजगाराच्या प्रश्नांवर अस्वस्थ असल्याचे चित्र दिसत आहे. ही परिस्थिती कोणत्याही सरकारसाठी धोक्याची घंटा असते. कारण तरुणांचा पाठिंबा हा केवळ निवडणुकीपुरता नसतो; तो देशाच्या भविष्यासाठी महत्त्वाचा असतो.

शिक्षण आणि रोजगार ही कोणत्याही राष्ट्राच्या विकासाची दोन प्रमुख चाके आहेत. जर याच क्षेत्रांबाबत संशय निर्माण झाला तर त्याचा परिणाम सामाजिक स्थैर्यावर होतो. लाखो युवक बेरोजगारी, स्पर्धा आणि अनिश्चिततेशी झुंज देत असताना त्यांच्या मनात व्यवस्थेविषयी अविश्वास निर्माण होणे ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे सरकारने या आंदोलनाकडे केवळ राजकीय चष्म्यातून न पाहता सामाजिक आणि राष्ट्रीय प्रश्न म्हणून पाहण्याची गरज आहे.

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी मान्य होईल किंवा नाही, हा वेगळा मुद्दा आहे. परंतु विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्नांना उत्तर देणे, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे, चौकशी यंत्रणांना निष्पक्षपणे काम करू देणे आणि भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही याची हमी देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. विश्वास निर्माण करणे ही कोणत्याही प्रशासनाची सर्वात मोठी जबाबदारी असते.

आज देशातील तरुणाई केवळ घोषणांवर समाधानी राहणारी नाही. ती माहितीपूर्ण, जागरूक आणि प्रश्न विचारणारी पिढी आहे. सोशल मीडियाच्या युगात प्रत्येक घटना काही क्षणांत देशभर पोहोचते. त्यामुळे जनभावना दुर्लक्षित करणे आता कोणत्याही सरकारला परवडणारे नाही. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना वेळेत न्याय मिळाला नाही तर असंतोषाचे रूपांतर मोठ्या सामाजिक आंदोलनात होऊ शकते.

जंतर-मंतरवरील आंदोलनाचा सर्वात महत्त्वाचा संदेश म्हणजे देशातील तरुणांना केवळ आश्वासने नकोत, तर विश्वासार्ह व्यवस्था हवी आहे. त्यांच्या परिश्रमाला न्याय मिळावा, संधी समान असाव्यात आणि स्पर्धा परीक्षांमध्ये पारदर्शकता असावी, एवढीच त्यांची अपेक्षा आहे. या अपेक्षांचा आदर करणे ही लोकशाहीची आणि सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे. अन्यथा आज जंतर-मंतरवर उमटलेला आवाज उद्या संपूर्ण देशाच्या राजकारणाचा केंद्रबिंदू ठरू शकतो.




# लोहार समाजाचा लोह आक्रोश !

## शासनाकडून लोहार समाजाची उपेक्षा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री तसेच दोन्ही माननीय उपमुख्यमंत्री यांच्याकडे अखिल लोहार गाडी लोहार विकास संस्था महाराष्ट्र राज्य



पुणे, लोह क्रांती एक विचारधारा सामाजिक चळवळ संस्थेच्या वतीने महाराष्ट्र विधान परिषदेतील राज्यपाल नियुक्त १२ सदस्यांपैकी एका स्वीकृत सदस्यपदासाठी लोहार समाजाला प्रतिनिधित्व देण्याची मागणी करण्यात आली होती. यासाठी वेळोवेळी वारंवार निवेदने, पत्रव्यवहार तसेच सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्यात आला. मात्र इतका पाठपुरावा करूनही लोहार समाजाच्या मागणीची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे समाजाच्या मागणीपत्राला जणू केराची टोपली दाखविण्यात आल्याची भावना संपूर्ण लोहार समाजामध्ये निर्माण झाली आहे. राज्याच्या सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या लोहार समाजाला राजकीय प्रतिनिधित्वापासून वंचित ठेवणे ही अत्यंत खेदजनक बाब आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये सर्व समाजघटकांना न्याय्य प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक असताना लोहार समाजावर वारंवार अन्याय होत असल्याची तीव्र भावना

**' प्रतिनिधित्व हा आमचा घटनात्मक अधिकार आहे; उपेक्षा आता सहन केली जाणार नाही!'**

लोहार समाज बांधवांमध्ये आहे. लोहार समाजाच्या भावना आणि मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत राहिल्यास राज्यभर तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशारा समाजाच्या वतीने देण्यात येत आहे. आगामी काळात लोहार समाज आपल्या न्याय्य हक्कासाठी लोकशाही मार्गाने व्यापक लढा उभारेल. अशी माहिती लोह क्रांती एक विचारधारा सामाजिक चळवळ. अध्यक्ष संजय कोलबेकर, अखिल लोहार गाडी लोहार समाज विकास संस्था महाराष्ट्र राज्य पुणे अध्यक्ष कुमारभाऊ थोरात, कार्यवाहक दिलीप लोहार यांनी दिली आहे.

# तहसील कार्यालयात सोमवारी आ. आशुतोष काळेंचा जनता दरबार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव मतदार संघातील नागरीकांना शासकीय कार्यालयात येणाऱ्या अडचणी जनता दरबाराच्या माध्यमातून आ.आशुतोष काळे यांनी सोडविल्या आहेत. हि जनता दरबाराची परंपरा अविरतपणे सुरु ठेवून पंचायत समितीच्या सर्व विभागात नागरीकांना येणाऱ्या अडचणी व समस्या सोडविण्यासाठी सोमवार (दि.०८) रोजी दुपारी ०३:०० वा. कोपरगाव तहसील कार्यालयात आमदार आशुतोष काळे जनता दरबार घेणार आहेत. अशी माहिती आ.आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून देण्यात आली आहे.



मतदार संघातील बहुसंख्य नागरिकांचे अनेक शासकीय कार्यालयात विविध प्रकारची कामे असतात. त्या कामांचा पाठपुरावा करण्यासाठी सर्वसामान्य नागरिक, अपंग व्यक्ती, विधवा महिला, जेष्ठ नागरिक, माजी सैनिक, शेतकरी अशा सर्वच स्तरातील सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय कार्यालयात कामानिमित्ताने ये-जा असते. सर्व शासकीय कार्यालयात मतदार संघातील नागरिकांची असलेली कामे विना अडथळा लवकरात लवकर व्हावीत.यासाठी नागरीकांना येणाऱ्या अडी-अडचणी समजून घेवून या अडीअडचणी विविध शासकीय कार्यालयांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसमवेत एकाचवेळी चर्चा घडवून ते प्रश्न तातडीने सुटावे यासाठी आ.आशुतोष काळे जनता दरबार घेत आहेत. ज्या नागरीकांच्या पंचायत समितीच्या बाबतीत अडचणी आहेत अशा नागरिकांनी सोमवार (दि.०८) रोजी दुपारी ०३:०० वा. कोपरगाव तहसील कार्यालयात उपस्थित राहून आपल्या अडचणी व तक्रारी लेखी स्वरूपात मांडाव्या. जेणेकरून कमी वेळात जास्तीत जास्त नागरिकांचे प्रश्न सुटले जातील. त्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन आ.आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# भाजप पदाधिकाऱ्यांच्या निवेदनाची दखल

## नेवासा येथून अहिल्यानगरसाठी जादा बसेस

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** अहिल्यानगरकडे जाणाऱ्या मार्गावर बसेसच्या फेऱ्या कमी असल्याने महामार्गावरील विविध थांब्यावर प्रवाशांची मोठी गर्दी होऊन त्यांना तास न तास बसेस ची वाट पहावी लागत होती याबाबत भाजपचे युवा नेते शहराध्यक्ष मनोजअण्णा पारखे यांनी ही बाब आगार व्यवस्थापक प्रशांत होले यांच्या कानावर घालून अशी निवेदनाद्वारे जादा बसेस सोडण्याची मागणी केली या मागणीची त्वरित दखल घेत जादा बसेस सोडण्यात येईल अशी ग्वाही दिल्याने आता प्रवाशांची गैरसोय दूर होणार आहे.



सध्या उन्हाळी सुट्ट्यांचा काळ सुरू असल्याने नेवासा ते अहिल्यानगर मार्गावरील प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे मात्र या मार्गावरील बसच्या फेऱ्या अपुऱ्या असल्याने नेवासा बसस्थानक तसेच मार्गावरील विविध थांब्यावर प्रवाशांची मोठी गर्दी होत असून प्रवाशांची गैरसोय होत होती.

या पार्श्वभूमीवर भाजपा युवा नेते मनोजअण्णा पारखे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शनिवारी आगार व्यवस्थापक प्रशांत होले यांची भेट घेऊन नेवासा ते अहिल्यानगर मार्गावरील बसच्या फेऱ्या वाढविण्याची मागणी केली. यावर सकारात्मक प्रतिसाद देत होले यांनी रविवार पासूनच नेवासा ते अहिल्यानगर मार्गावर वाढीव बस फेऱ्या सुरू करण्यात येतील असे आश्वासन दिले.

प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी प्रशासनाने तातडीने दखल घेतल्याबद्दल आगार व्यवस्थापक प्रशांत होले यांना धन्यवाद देत भाजप पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने आभार मानले यावेळी भाजपचे रोहीत पवार, युवा मोर्चा शहराध्यक्ष शिवाभाऊ लष्करे, भाजपा सचिव रामदास लष्करे उपस्थित होते.

# अपघातातील जखमी तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**रायते :** अपघातात गंभीर जखमी झालेल्या निमगाव टेंभी येथील एका १८ वर्षीय तरुणाचा घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. वैभव विलास कदम (वय १८, रा. देवगड वस्ती, निमगाव टेंभी, ता. संगमनेर) असे मृत तरुणाचे नाव आहे. अपघातात गंभीर जखमी झाल्यानंतर त्याला उपचारासाठी घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असताना ५ जून २०२६ रोजी दुपारी सुमारे २.१५ वाजता त्याची प्राणज्योत मालवली.

घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या मेमोच्या आधारे संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) कलम १९४ अन्वये अकस्मात मृत्यू रजिस्टर क्रमांक ६९/२०२६ दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच संगमनेर तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी प्रवीण साळुंखे यांनी प्रकरणाची दखल घेतली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल जे. के. खेमनर पुढील तपास करीत आहेत. या घटनेमुळे निमगाव टेंभी परिसरात हळहळ व्यक्त होत असून वैभव कदम यांच्या निधनाने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# पर्यावरणशास्त्रात हरित भविष्य घडविणाऱ्या करिअरच्या अमर्याद संधी : डॉ. आर. ए. पवार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** वाढते नागरीकरण, औद्योगिकीकरण, जंगलतोड, प्रदूषण आणि हवामान बदल यांसारख्या गंभीर पर्यावरणीय समस्यांमुळे पर्यावरणशास्त्र या विषयाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत असून विद्यार्थ्यांसाठी हे क्षेत्र उज्ज्वल आणि भविष्याभिमुख करिअरच्या अमर्याद संधी निर्माण करणारे ठरत असल्याचे प्रतिपादन डॉ. आर. ए. पवार यांनी केले. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. पर्यावरण संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन आणि शाश्वत विकासासाठी प्रशिक्षित पर्यावरणतज्ज्ञांची गरज वाढत असल्याने या क्षेत्राकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अरुणा झिने



यांनी पर्यावरणशास्त्र हा जीवशास्त्र, रसायनशास्त्र, भूगोल, हवामानशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान, भूगर्भशास्त्र आणि पर्यावरण व्यवस्थापन या विविध शाखांचा समन्वय साधणारा बहुआयामी विषय असल्याचे स्पष्ट केले. या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना प्रदूषण नियंत्रण, जैवविविधता संवर्धन, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणीय कायदे आणि नैसर्गिक संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन याविषयी सखोल ज्ञान मिळते, असे त्यांनी सांगितले. पर्यावरणशास्त्रात पदवी, पदव्युत्तर तसेच पीएच.डी. स्तरावर शिक्षणाच्या व्यापक संधी उपलब्ध असून कोणत्याही विज्ञान शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांना या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेता येते. नेट, सेट, गेट आणि जेआरएफसारख्या स्पर्धा परीक्षांद्वारे अध्यापन व संशोधन क्षेत्रात करिअर घडविण्याची संधीही उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. पर्यावरण अधिकारी, प्रदूषण नियंत्रण अधिकारी, पर्यावरण सल्लागार, हवामान बदल विश्लेषक, जल व मृदा विश्लेषक, पर्यावरण पत्रकार, कचरा व्यवस्थापन तज्ज्ञ आणि हरित ऊर्जा सल्लागार अशा विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, हरित ऊर्जा आणि शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांमुळे पर्यावरणशास्त्राला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून हरित करिअर निवडा, शाश्वत भविष्य घडवा असा संदेश देत युवा पिढीने राष्ट्राच्या हरित विकासात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन डॉ. झिने यांनी केले.

# टाकळीभान येथे फसव्या कर्जमाफीची होळी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** राज्य सरकारने नुकतीच कर्जमाफीची घोषणा केल्यानंतर शेतकऱ्यांच्या त्यावर निषेधाच्या प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. काल टाकळीभान येथे महाराष्ट्र राज्य मार्ग क्रमांक ४४ रोडवर येऊन टाकळीभान येथील शेतकऱ्यांनी राज्य सरकारने फसव्या कर्जमाफीच्या जीआरची होळी करून निषेध व्यक्त केला. त्यामुळे नुकत्याच जाहीर झालेल्या कर्जमाफीवर शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला असून झालेल्या कर्जमाफीचा लाभ कोणत्याच मूळ खऱ्या, गरजू कर्जदारांना होत नसून निव्वळ फसवी कर्जमाफी असल्याच्या प्रतिक्रिया शेतकऱ्यांमधून उमटत आहेत.



नेमकी मग ही कर्जमाफी कोणाला असा प्रश्न कर्जबाजारी शेतकऱ्यांना पडला आहे. तसेच यामधील थोडेफार जे शेतकरी कर्जमाफी बसतात त्यांना

**२०१७ व २०१९ या कर्जमाफीतील जाचक नियम,अटी व तांत्रिक अडचणीमुळे कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांसाठी विनाअट या कर्जमाफीमध्ये त्यांचा समावेश करणे गरजेचे होते तसेच २००८ मध्ये झालेली सरसकट कर्जमाफी त्या धरतीवर कर्जमाफी होणे आवश्यक होते, परंतु तसा कोणताही योग्य तो धोरणात्मक निर्णय कर्जमाफी बद्दल शासनाने घेतला नसून केवळ शेतकऱ्यांची दिशाभूल या कर्जमाफी द्वारे केली आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाकडून या कर्जमाफीचा निषेध व्यक्त करण्यात येत आहे.**


या जीआर मध्ये २०१७ व २०१९ पूर्वी थकीत कर्ज झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आलेला नसून,२०१९ कर्जमाफीतील लाभार्थी शेतकऱ्यांना फक्त ५० हजार रुपया पर्यंतची कर्जमाफी देऊन त्यांच्यावरील कर्जाचा बोजा तसाच ठेवण्यात येत असून दोन्ही कर्जमाफीतील शेतकरी मूळ कर्जबाजारी शेतकरी आहेत. उर्वरित वरील रक्कम शासनाने भरायला लावली असून तरच थकीत कर्जबाजारी शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. या २०२६ च्या अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेसाठी अशा जाचक अटी लावल्या आहेत. शेतकरी अगोदरच अडचणीत असून कोणत्याही शेतमालाला योग्य तो भाव नाही, व कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांची खाते थकीत असून शेतकरी अत्यंत अडचणीत असून तो परत कर्जामधील काही रक्कम भरण्यास सक्षम नाही.त्यामुळे ही कर्जमाफी केवळ ही शेतकऱ्यांची दिशाभूल असून यामध्ये कर्जबाजारी शेतकऱ्यांना कोणताही लाभ मिळत नाही. त्यामुळे टाकळीभान येथील शेतकऱ्यांनी सरकारने काढलेल्या कर्जमाफीचा जीआरची होळी केली असून या कर्जमाफीचा जाहीर निषेध केला आहे. याप्रसंगी टाकळीभान लोकसेवा विकास आघाडीचे अध्यक्ष शिवाजीराव शिंदे, ज्येष्ठ शेतकरी दादासाहेब कापसे, ज्येष्ठ शेतकरी अ‍ॅड. धनराज कोकणे, सोसायटीचे माजी चेअरमन एकनाथ पटारे,ग्राम. सदस्य सुनील बोडखे, मच्छिंद्र कोकणे, संजय पटारे,योगेश बिरदवडे, रामेश्वर शिंदे, दादासाहेब गोंडे आदी सह शेतकरी बांधव उपस्थित होते.

# कृषकांचे नेते: माजी खासदार गोविंदराव आदिक साहेब

**महाराष्ट्रातील झुंजार नेतृत्व शेतकऱ्यांसाठी धडपडणारे आदर्श कर्तृत्व व महाराष्ट्र कृषक समाजाचे नेतृत्व, शेतमजूर ,कष्टकऱ्यांचे मातृत्व असणारे माजी खासदार गोविंदरावजी साहेब यांच्या स्मृती दिनानिमित्त..**

---------------

संघर्षातून विकास साधणारे, समाज मनावर स्वतःचा ठसा उमटवणारे, संघटन कौशल्य, प्रेमळ कुटुंबवत्सल ,कुशल बुद्धिमत्तेचा कायदेतज्ज्ञ, शेतकऱ्यांचा न्यायदाता, गरिबांचा तारणहार, आपल्या अमोघ वक्तृत्वाने आणि उत्कृष्ट वक्तृत्व शैली लाभलेले नेते खा. गोविंदरावजी आदिक साहेब होय. गोदावरी काठी वसलेल्या खानापूर या छोट्याशा खेडेगावात ४ जानेवारी १९३९ ला जन्म झाला. या गोदारत्नाच्या कार्यकर्तृत्वाचा इतिहास बघितला तर मौनाला अंकुर फुटल्या शिवाय राहत नाही. १)१९६० ते ७० मध्ये जिल्हा न्यायालयाची स्थापना समाजसेवा मंडळाची स्थापना., २)अहिल्यानगर जिल्हा महामंडळाची स्थापना,.३) १९६६ मध्ये मुळा प्रवरा वीज सोसायटीचे पहिले उपाध्यक्ष. ४)१९७० मध्ये श्रीरामपूर मतदारसंघाचे आमदार. ५)१९७८ मध्ये महाराष्ट्राच्या पुरोगामी लोकशाही दल सरकार मध्ये कॅबिनेट मंत्री. ६)१९८० मध्ये पुन्हा वैजापूर मतदारसंघातून आमदार. ७)१९७६ ते ७८ अशोक सहकारी साखर कारखान्याचे व्यवस्थापक. १९७२ ८). श्रीरामपूर मतदारसंघाचे आमदार.९) १९७८ ते ७९ मध्ये पाटबंधारे आणि लाभ क्षेत्र विकास विधी व न्याय माहिती व जनसंपर्क कॅबिनेट मंत्री,१०) १९८० मध्ये छत्रपती संभाजीनगर मतदारसंघातून विजयी होऊन विधानसभेवर पुनर्निर्वाचित पुन्हा आमदार. ११)सन २००६ मध्ये महाराष्ट्र कृषक समाज या संघटनेची स्थापना १२).. सन २०१० मध्ये राष्ट्रीय किसान सभेचे अध्यक्ष असताना, २२ फेब्रुवारी २००२ रोजी महाराष्ट्र कृषक समाजाची ११ कलमी सनद काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या सोनियाजी गांधी यांना प्रदान करून शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे व्यवस्थेचे लक्ष वेधून योग्य ती उपाययोजना करण्याचे सुचवले. १३)सन २० ऑक्टोबर २०१० ते २९ ऑक्टोबर या कालावधीत संयुक्त राष्ट्र संघ (युनो )मध्ये भारताचे प्रतिनिधी म्हणून चर्चेमध्ये सहभाग.१४) सन २००९ नासिक येथे राष्ट्रवादी काँग्रेस महामेळाव्यात अखिल भारतीय सरचिटणीस म्हणून जबाबदारी. हिमालयातील असणारे अफाट लोकसंग्रहातून निवृत्त मानस की जपणारे वास्तवाशी सामना करत व कर्तृत्वातून नवा इतिहास घडवणारे साहेब कधीच कोणत्याही वादळाने विचारीत झाले नाही. फळाची अपेक्षा न करता आयुष्याच्या शेवटपर्यंत निरंतर कार्यरत राहिले. आपला महाराष्ट्र दुष्काळात होरपळत असताना गरिबी, नापिकी, दुष्काळ,यामध्ये सापडलेला आपला शेतकरी राजा आत्महत्या करतो आहे .अशावेळी साहेबांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. कारण त्यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र कृषक समाजाचे आल ११ कलमी सनद ही ग्रामीण परिवर्तनाची नांदीच होती. शेतकऱ्यांचे १४ चौकड्यांचे दारिद्र्य कायमस्वरूपी घालवण्यासाठी आयुष्याच्या शेवटपर्यंत सज्ज राहिलेला एकमेव नेता म्हणजे गोविंदरावजी आदिक साहेब होय. संशोधक, अर्थतज्ञ, शेतकरी, शासकीय अधिकारी, समाजसेवक अशा अनेक विद्वानांशी चर्चा करून साहेबांनी चिंतन करून कृषी समाजाचा आराखडा तयार केला. शेतीचा प्रश्न प्रामुख्याने १४ विषयाशी संबंधित आहे .जमीन, हवामान, पाणी, बियाणे ,औषधे, खते, अवजारे ,मजूर, संकटे, प्रक्रिया, साठवण, वाहतूक, पत, बाजारभाव याविषयी चिंतन करून अकरा कलमी शेतकऱ्यांची सनद तयार केली आणि शेतकऱ्यांचे प्रश्न गल्लीपासून दिल्लीपर्यंत पोहोचवले. कृषिमंत्री असताना कृषी सप्तक कार्यक्रमाद्वारे अहिल्यानगर येथे कृषी समाजाचे महा अधिवेशन यशस्वी केले. 'आंतरराष्ट्रीय दहशतवाद' या विषयावर युनो मध्ये भारतीय संसदेचे प्रतिनिधित्व करून आपले विचार मांडले. पाच वेळा आमदार, दोनदा खासदार, एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष, दोनदा मंत्रीपद, नील मजदूर संघ इंटर ऊस तोडणी कामगार अशा विविध संघटनांचे नेतृत्व साहेबांनी केले, त्यांनी भूषवलेली पदे, कृषिमंत्री असताना शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक केली. ''स्वतःसाठी जगता जगता दुसऱ्यासाठी जगले पाहिजे.. दुसऱ्याचे अश्रू पुसत समाजाचे ऋण फेडले पाहिजे.''. हे सतत त्यांनी कृतीतून दाखवून दिले. केवळ राजकीय नव्हे तर साहित्यिक सांस्कृतिक सामाजिक शैक्षणिक या क्षेत्रातील कार्यातून गोविंदरावजी आदिक साहेब यांनी महाराष्ट्र वैचारिक दृष्ट्या समृद्ध केला आहे. खंडकऱ्यांची चळवळ असो, जेलभरो आंदोलन असो, किंवा शेतकऱ्यांची कर्जमाफी आंदोलन असो या कामी साहेबांनी नेहमीच पुढाकार घेतला. आदिक साहेब जेथे जेथे सत्तेवर गेले तेथे तेथे त्यांनी स्वतःची नाममुद्रा स्थापित केली. एस टी महामंडळाचे अध्यक्ष असताना जनतेच्या सोयीसाठी पंचसूत्री कार्यक्रम दिला. हिंदी, इंग्रजी भाषेवर विशेष प्रभुत्व उत्कृष्ट वक्तृत्व शैली हिंदी शेरोशायरी लाभलेले दिलदार मनाचे साहेब आज आपल्यात नाही याची खंत वाटते. साहित्य, नाट्य, चित्रपट, संगीत, क्रीडा ,विज्ञान अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांशी साहेबांचे निकटचे व मैत्रीचे संबंध होते. रसिकता, गुणग्राहकता, हे त्यांचे गुण होते. जे जे उत्तम त्याचा आस्वाद घेण्याची उच्च अभिरुची त्यांनी जोपासली. साहेबांसारखा थोर नेता शतकातून एकदाच जन्म घेतात .त्यांचे जीवन आधार मात्र आधार वडासारखं असतं त्यांच्या आधाराने अनेक जण वाढतात मोठे होतात . म्हणतात ना.. मरावे परी कीर्तिरूपे उरावे.. साहेब आज आपल्यात नाहीत परंतु त्यांचे विचार , संस्कार व त्यांचे आभाळाएवढं कार्य आपल्यासमोर आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला एक जरी गुण आपण अंगीकारला तर आपले संपूर्ण जीवन 'कृतार्थ' झाल्याशिवाय राहणार नाही. साहेबांचे सुपुत्र युवा नेते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस पदी विराजमान आहेत. महाराष्ट्राचे स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार साहेब यांचे विश्वासू सहकारी म्हणून अविनाश दादांची खास ओळख आहे.पक्षाची ध्येय धोरणे, व बळकटीकरण. यामध्ये दादांचा सिंहाचा वाटा आहे. साहेबांच्या कन्या अनुराधा ताई आदिक महाराष्ट्र कृषक समाजाच्या माध्यमातून समाज कार्यामध्ये कार्यरत आहेत. सामाजिक, सांस्कृतिक, व शैक्षणिक कृषक या सर्व क्षेत्रांमध्ये त्या सदैव क्रियाशील आहेत. अविनाश दादा आदिक व अनुराधाताई साहेबांचा वारसा समर्थपणे चालवत आहेत. ७ जून २०१५ रोजी या कृषीकांच्या क्रांती सूर्याला ग्रहण लागले दिशा काळवंडल्या हवा सुन्न झाली. वसंतदादा पाटील, यशवंतराव चव्हाण, यांच्यातील एक तारा खळकन निखळला .सामाजिक न्यायाचा उद्घोष करणारा नेता निमाला. कृषकांचा वाली गेला. एक शेतकरी म्हणाला नाही रे नाही आमच्या गरिबांच्या पोरांची आधाराची काठी गेली रे.आधाराची. काठी गेली... म्हणतात ना ..पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा.. दोष ना कुणाचा वेड्या दोष ना कुणाचा... गोदा रत्न माजी खा. गोविंदरावजी आदिक साहेब यांच्या स्मृतींना त्रिवार वंदन.



**डॉ. संगीता चंद्रभान फासाटे (कटारे)**
**इंदिरानगर. श्रीरामपूर.**
**जिल्हा अहिल्यानगर.**
**मोबाईल**
**९५१८९००५७८.**

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दखल

## श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात सोमवारी रोजगार मेळावा

**नेवासा** : मुळा एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष यशवंतराव गडाख यांच्या प्रेरणेने व उपाध्यक्ष उदयनदादा गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात सोमवार, दि. ८ जून रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत हा मेळावा होणार असल्याची माहिती प्राचार्य अरुण घनवट यांनी दिली. या मेळाव्यात इयत्ता दहावीपासून पदवीपर्यंतचे विद्यार्थी सहभागी होऊ शकणार आहेत. तसेच आयटीआय व डिप्लोमा पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. संभाजीनगर व पुणे येथील पाच नामांकित कंपन्यांशी करार करून हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सोनई, भेंडा, दहिगाव, माका, शेवगाव परिसरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनीही या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांकडे कौशल्य असूनही रोजगाराच्या संधींपर्यंत पोहोचण्यात अडचणी येतात. ही बाब लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी त्यांच्या दारात उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न महाविद्यालयाने केला आहे. विद्यार्थ्यांनी या रोजगार मेळाव्यात सहभागी होऊन आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करावे व करिअर घडविण्याची संधी साधावी, असे आवाहन उदयन गडाख यांनी केले आहे.

## श्रीक्षेत्र ताहाराबाद येथे अधिक मासानिमित्त श्रीमद् भागवत कथेचे आयोजन



**ताहाराबाद** : श्रीक्षेत्र ताहाराबाद येथे अधिक मास तथा पुरुषोत्तम मासानिमित्त सोमवार, दि. ८ जून ते १५ जून दरम्यान श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सायंकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत भागवताचार्य मनोहर महाराज सिनारे यांच्या सुश्राव्य वाणीतून भागवत कथेचे चिंतन होणार आहे. श्री संत कवी महिपती महाराज देवस्थान यांच्या वतीने आयोजित या धार्मिक सोहळ्यात श्री संत कवी महिपती महाराज यांच्या हस्तलिखित भक्तविजय ग्रंथाचे पारायण, हरिपाठ, अभिषेक तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. समारोपाच्या दिवशी, १५ जून रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत काल्याचे कीर्तन, दहीहंडी व महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. अधिक मासानिमित्त ज्ञानदान व अन्नदान यज्ञाचेही आयोजन करण्यात आले असून भाविकांसाठी भव्य मंडप, विद्युत रोषणाई व भोजन व्यवस्थेची तयारी करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील विविध संत-महंत या सोहळ्याला भेट देणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. श्री संत कवी महिपती महाराज मंदिर परिसरात प्रथमच मनोहर महाराज सिनारे यांची भागवत कथा होत असल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या धार्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष राजेंद्र साबळे व मठाधिपती अर्जुनजी महाराज तनपुरे यांनी केले आहे.

# प्राजक्त तनपुरे यांची विधान परिषदेवर बिनविरोध निवड, राहुरीत जल्लोष

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांची महाराष्ट्र विधान परिषदेवर बिनविरोध निवड झाल्यानंतर राहुरी तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निवडीमुळे सर्वत्र जल्लोष होत असून तालुक्यात व शहरात ठिकठिकाणी फटाक्यांची आतशबाजी करण्यात येत होती. राहुरी शहरात आमदार प्राजक्त तनपुरे यांचे स्वागत करण्यात येत होते ठीक ठिकाणी महिला भगिनींनी त्यांचे औक्षण केले.आमदार तनपुरे यांनी यापूर्वी राज्य मंत्रिमंडळात महत्त्वाची जबाबदारी सांभाळली असून, राहुरी मतदारसंघाच्या विकासासाठी विविध योजना राबवल्या आहेत. त्यांच्या - या राजकीय अनुभवाचा व प्रशासनातील कामकाजाचा लाभ विधान परिषदेत राज्याच्या विकासासाठी होईल, असा विश्वास कार्यकर्ते व समर्थकांनी व्यक्त केला आहे.

महाविकास आघाडी सरकारमध्ये अडीच वर्षे असलेल्या मंत्री पदाचा अनुभव पाठीशी असल्यामुळे त्यांच्या निवडीने जिल्ह्याच्या विकासाचे प्रश्न राज्य पातळीवर अधिक प्रभावीपणे मांडले जातील, अशी भावना व्यक्त होत आहे.

त्यांच्या या बिनविरोध निवडीबद्दल राहुरी तालुक्यातील भाजपच्या व तनपुरे समर्थक कार्यकर्त्यांनी जल्लोष करीत आनंदोत्सव साजरा केला. या वेळी कार्यकर्त्यांनी एकमेकांना मिठाई वाटून शुभेच्छा दिल्या.तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनीही तनपुरे यांचे अभिनंदन केले आहे. प्राजक्त तनपुरे यांच्या निवडीमुळे राहुरी तालुक्याच्या विकासकामांना अधिक गती मिळेल, तसेच प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासनाकडे प्रभावी पाठपुरावा होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# खोटा गुन्हा दाखल केल्याचा आरोप; निष्पक्ष चौकशीची मागणी

## जिल्हा पोलीस प्रमुखांनी मागविला अहवाल

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वादातून आपल्याविरोधात खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोप करत सोनई येथील शेतकरी अनिल भळगट यांनी या प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून न्याय देण्याची मागणी मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस प्रमुखांकडे ई-मेलद्वारे निवेदन पाठवून केली आहे.

भळगट यांनी दिलेल्या निवेदनानुसार, सोनई येथील हनुमानवाडी शिवारातील गट क्रमांक ५८३/२ मधील वडिलोपार्जित शेतजमिनीबाबत न्यायालयात दिवाणी दावा तसेच प्रांत अधिकाऱ्यांकडे महसूल अपील प्रलंबित आहे. ही प्रक्रिया सुरू असताना विरोधी पक्षकारांनी महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या मदतीने अनधिकृत फेरफार मंजूर करून घेतल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे.

तसेच संबंधित प्रकरणात पोलिसांनी आपल्या पदाचा गैरवापर करून जमीन ताब्यातून सोडण्यास तसेच फौजदारी प्रकरण मागे घेण्यासाठी दबाव टाकल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या दबावाला बळी न पडल्यामुळे ५ जून २०२६ रोजी सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २५९/२०२६ अंतर्गत स्वतःसह १५ ते २० अनोळखी महिलांविरुद्ध खोटा व बनावट गुन्हा दाखल करण्यात आल्याचा दावा भळगट यांनी केला आहे.

या प्रकरणामुळे कुटुंब मानसिक तणावाखाली असून जीवितास धोका निर्माण झाल्याचेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. सदर गुन्ह्याची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करून तो रद्द करावा, संबंधित पोलीस अधिकारी व विरोधी पक्षकारांवर कायदेशीर कारवाई करावी तसेच कुटुंबाला पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, अनिल भळगट यांनी जिल्हा पोलीस प्रमुखांची प्रत्यक्ष भेट घेतल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. तसेच कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्याचेही सांगण्यात येत आहे.

# जेईई ॲडव्हान्समध्ये आदित्य गोंदकरची उल्लेखनीय कामगिरी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी** : राहाता तालुक्यातील को-हाळे येथील श्रीगणेश शिक्षण संस्थेचा विद्यार्थी आदित्य गोंदकर याने जेईई ॲडव्हान्स २०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत आयआयटी प्रवेशासाठी पात्रता मिळवली आहे. आदित्यने ओबीसी प्रवर्गात ६८,०८३ रँक प्राप्त केली असून त्याच्यासाठी आता भारतीय तंत्रज्ञान संस्थांचे (आयआयटी) दार खुले झाले आहे.

आदित्यच्या यशामागे त्याची जिद्द, कठोर परिश्रम आणि संस्थेचे संस्थापक प्रा. विजय शेटे यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व विविध प्रवेश परीक्षांसाठी दर्जेदार मार्गदर्शन देण्याचे काम श्रीगणेश शिक्षण संस्था सातत्याने करत आहे. आदित्यची शैक्षणिक जडणघडण याच संस्थेत झाली असून त्याला योग्य दिशा मिळाल्याने हे यश शक्य झाल्याचे मानले जात आहे.

को-हाळे सारख्या ग्रामीण भागात उभी राहिलेली ही संस्था आज गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ओळखली जाते. स्पर्धा परीक्षा आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांच्या तयारीवर विशेष भर देणे हे संस्थेचे वैशिष्ट्य आहे. यंदा संस्थेतील तब्बल २७ विद्यार्थी जेईई मेन्स परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. आदित्यच्या यशामुळे संस्थेच्या गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली असून परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## श्रीरामपूरमध्ये शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री




**श्रीरामपूर** : रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त श्रीरामपूर शहरातील शिवतीर्थ येथे विविध सामाजिक व सांस्कृतिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्रोही सांस्कृतिक चळवळ, स्वाभिमानी मराठा महासंघ, डॉ. सलीम शेख बैतुशशिफा फाउंडेशन आणि भटकंती ट्रेकर्स यांच्या वतीने हा सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला.

कार्यक्रमादरम्यान जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. देशभक्तीपर वातावरणात उपस्थितांनी शिवरायांच्या कार्याला अभिवादन करत स्वराज्याच्या विचारांचा जागर केला. शिवराज्याभिषेक हा केवळ ऐतिहासिक सोहळा नसून स्वाभिमान, पराक्रम आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराची प्रेरणा देणारा दिवस असल्याचे यावेळी वक्त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला स्वाभिमानी मराठा महासंघाचे अध्यक्ष डॉ. कृषिराज टकले, सुनील कोळसे, विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे राज्य सदस्य डॉ. सलीम शेख, जिल्हाध्यक्ष अशोकराव दिवे, राज्य सदस्य शाहीर भीमराव कदम, कवी आनंदा साळवे, ॲड. अमोल सोनवणे, डॉ. नवनीत जोशी, ताजखान पठाण, संतोष त्रिभुवन, विजय जगताप, भय्या शाहा, कासार पाटील, बोंबले पाटील तसेच बालशाहीर टकले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिवरायांच्या विचारांचे संवर्धन आणि नव्या पिढीमध्ये राष्ट्रप्रेम, स्वाभिमान व सामाजिक बांधिलकीची प्रेरणा रुजविण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाला नागरिकांचीही उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

# शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर पुणतांब्यातील चारी दुरुस्तीचे काम बंद

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : महाराष्ट्र जलसिंचन सुधारणा योजनेअंतर्गत गोदावरी उजवा तट कालव्याच्या वितरण व्यवस्थेमार्फत सुरू असलेल्या वितरिका क्रमांक १९ च्या दुरुस्ती, रुंदीकरण व खोलीकरणाच्या कामाला शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. संबंधित कामात त्रुटी असल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून ठेकेदाराला काम बंद ठेवण्याच्या सूचना दिल्या.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून या कामांना मंजुरी मिळाली होती. नोव्हेंबर २०२५ मध्ये वाकडी येथे झालेल्या भूमिपूजन कार्यक्रमात त्यांनी चाऱ्यांची दुरुस्ती गुणवत्तापूर्ण करावी तसेच पाटबंधारे विभागाच्या नकाशानुसार सर्व अतिक्रमणे हटवावीत, अशा स्पष्ट सूचना अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. मात्र, गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या कामामध्ये केवळ वरवरची दुरुस्ती होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली. चाऱ्यांचे अपेक्षित खोलीकरण व रुंदीकरण न करता काम सुरू असल्याने शेतकरी वर्गाने नाराजी व्यक्त केली. तसेच अतिक्रमणधारकांना देण्यात आलेल्या नोटिसांमध्ये चाऱ्याची नेमकी हद्द स्पष्ट नसल्याने अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया प्रभावीपणे राबविली गेली नसल्याचेही समोर आले. शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल घेत चितळी व राहाता सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली.

त्यानंतर वस्तुस्थिती लक्षात घेऊन संबंधित काम तात्पुरते बंद करण्याचे आदेश देण्यात आले. दरम्यान, चाऱ्याची अधिकृत रुंदी १९ मीटर असल्याची माहिती सिंचन विभागाने दिल्याने अतिक्रमणधारकांमध्ये खळबळ उडाली आहे. काम दर्जेदार व नियमांनुसार व्हावे, यासाठी शेतकरी वर्ग आग्रही असून आवश्यक सुधारणा झाल्यानंतरच काम पुन्हा सुरू करण्याची मागणी करण्यात येत आहे.

## छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त ११ जोडप्यांच्या हस्ते शिवाजी महाराजांना अभिवादन



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : शिवराज्याभिषेक दिन (हिंदू साम्राज्य दिन) निमित्ताने विविध समाजघटकांतील ११ दाम्पत्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला अभिषेक करण्यात आला.

राहुरीतील सामाजिक समरसता विभागाच्या वतीने हा केवळ धार्मिक विधी नसून सामाजिक समरसतेचा एक सुंदर संदेश आहे.छत्रपती शिवाजी महाराजांनी कधीही जात, पंथ, भाषा किंवा जन्म यावरून भेदभाव केला नाही. त्यांच्या स्वराज्यात प्रत्येक व्यक्तीला सन्मान आणि न्याय मिळत होता. महाराजांच्या सैन्यात, प्रशासनात आणि अष्टप्रधान मंडळात विविध समाजातील लोकांना समान संधी मिळाली. म्हणूनच शिवरायांचे स्वराज्य हे खऱ्या अर्थाने लोकांचे राज्य होते. आज समाजामध्ये अनेक प्रकारच्या भिंती उभ्या राहण्याचा प्रयत्न होत आहे. अशा वेळी शिवरायांचा आदर्श आपल्याला सांगतो की, समाजाची ताकद त्याच्या एकतेत असते. जाती वेगळ्या असतील, परंपरा वेगळ्या असतील, पण आपली संस्कृती, आपला देश आणि आपली माणुसकी एकच आहे. सामाजिक समरसता म्हणजे फक्त एकत्र बसणे किंवा कार्यक्रम करणे नाही.

सामाजिक समरसता म्हणजे प्रत्येक व्यक्तीचा आदर करणे, प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि समाजात बंधुभाव निर्माण करणे होय. संत परंपरेनेही हाच संदेश दिला आहे.संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत गाडगेबाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांनी समाजाला समतेचा आणि बंधुभावाचा मार्ग दाखवला. शिवरायांच्या स्वराज्याचे स्वप्न आणि या महापुरुषांच्या विचारांचे ध्येय एकच होते - सर्वांना सन्मानाने जगण्याचा अधिकार आज हिंदू साम्राज्य दिन साजरा करताना आपण फक्त इतिहासाची आठवण काढणार नाही, तर समाजातील भेदभाव, मतभेद आणि दुरावा दूर करण्याचा संकल्प करू.आपल्या गावात, आपल्या परिसरात, आपल्या कुटुंबात समरसतेची भावना रुजवूया.

एक गाव - एक समाज - एक कुटुंब ही भावना निर्माण करूया. हीच शिवरायांना खरी आदरांजली ठरेल.शेवटी, सामाजिक समरसता मंचाने आयोजित केलेल्या या सुंदर उपक्रमासाठी अनेकांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमा प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व राहुरी तालुका सामाजिक समरसता यांचे संयोजक मयूर दुधाडे, प्रज्वल खैरे, मंदार जोशी, समिर धिमते, राजेंद्र भुजाडी ,गोरख जगधने, राजेंद्र आढागळे, श्रीकांत शेजुळ, मिलिंद साखला, सतीश फुलसौंदर, सुरज शिंदे, शिवम मैड, पंकज नारद, हेमंत बंड, ओम पोपळघट , शिवम कोकाटे व रेवती जोशी , अश्विनी गोरख जगधने, कविता राजेंद्र आढागळे या सर्वांची उपस्थिती होती.

# 'आपला दवाखाना' योजनेत गंभीर अनियमितता

## माटा यांची जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' योजनेंतर्गत श्रीरामपूर शहरातील आरोग्य केंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याबाबत युवा स्वाभिमान पक्षाचे जिल्हाध्यक्ष विवेक माटा यांनी थेट जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार दाखल केली.

माटा यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, श्रीरामपूरमधील काही 'आपला दवाखाना' केंद्रे नियमित वेळेत बंद असते.तर, काही ठिकाणी अनेक महिन्यांपासून वैद्यकीय अधिकारी अनुपस्थित राहत असल्याचे चित्र दिसून आले आहे.प्रत्यक्षात डॉक्टर



नसतानाही क श्रेणीतील कर्मचारी रुग्ण तपासणी करत असल्याचा आणि औषध वितरण केले जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला.

याचबरोबर रुग्ण तपासणी व सेवा नोंदीमध्ये खोट्या एन्ट्री करून शासनाकडून निधी उचलला जात असल्याचा संशय व्यक्त केला.

दररोज १८ ते २५ रुग्ण दाखवून बनावट रजिस्टर तयार केले जात असल्याचा दावाही तक्रारीत करण्यात आला. २६ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे अडीच वाजेच्या दरम्यान डोक्याला गंभीर दुखापत झालेला एक रुग्ण उपचारासाठी 'आपला दवाखाना 'केंद्रात गेल्यानंतर दवाखाना बंद असल्याची घटना घडल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

यानंतर संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात आला असता समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. युवा स्वाभिमान पक्षाचे जिल्हाध्यक्ष विवेक माटा यांनी या संपूर्ण प्रकाराला तालुका आरोग्य अधिकारी जबाबदार असल्याचा ठपका ठेवला असून, त्यांच्या देखरेखीखाली मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार सुरू असल्याचा आरोप केला आहे.सदरचे प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, तसेच संबंधित अधिकाऱ्यांचे कायमस्वरूपी निलंबन करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

तसेच आठ दिवसांत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या तक्रारीमुळे आरोग्य विभागात खळबळ उडाली असून जिल्हा प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रासायनिक खताचा संतुलित वापर करून आपली शेती वाचवा : शैलेश देशमुख



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

> कृषी विज्ञान केंद्राच्यावतीने आयोजित'खेत बचाओ अभियान'च्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये मृदा संवर्धन, शाश्वत शेती आणि वैज्ञानिक शेती पद्धतींबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात येत असून या उपक्रमाला शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**लोणी** : कृषी क्षेत्रात वाढत्या उत्पादनाच्या हाव्यापोटी रासायनिक खतांचा अतिवापर वापर होत असून त्याचा परिणाम जमिनीच्या आरोग्यावर होत आहे. जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी तसेच पिकांचे दर्जेदार आणि भरघोस उत्पादन घेण्यासाठी रासायनिक खतांचा संतुलित व कार्यक्षम वापर करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वरचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी केले.

भारत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून आणि कृषी मंत्रालय अंतर्गत पायरेन्सच्या विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथे स्वस्थ मिट्टी, सक्त किसान, समृद्ध भारत 'खेत बचाओ अभियान'स्वस्थ मिट्टी, अंतर्गत पालकमंत्री राधाकृष्ण विखे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम पायरेन्सचे सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी त्यांनी रासायनिक खतांचा संतुलित व कार्यक्षम वापर या विषयावर सखोल मार्गदर्शन करताना शेतकऱ्यांना खत व्यवस्थापनाच्या आधुनिक पद्धती समजावून सांगितल्या. या प्रशिक्षण कार्यक्रमात परिसरातील सुमारे ७५ शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. जमिनीचे आरोग्य दिवसेंदिवस खालावत चालल्याने पिकांची उत्पादकता आणि गुणवत्ता दोन्हीवर परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त करत डॉ.विलास घुले यांनी शाश्वत शेतीसाठी संतुलित खत व्यवस्थापनाचे महत्त्व विशद करुन त्यांनी सेंद्रिय आणि रासायनिक खतांचा योग्य समन्वय साधून शेती करण्याचे आवाहन केले.

यावेळी डॉ. प्रियंका खर्डे यांनी माती परीक्षणाचे महत्त्व विषद केले. कोणत्याही पिकाला खतांचा पुरवठा करण्यापूर्वी माती परीक्षण करणे अत्यंत आवश्यक असून, मातीतील उपलब्ध अन्नद्रव्यांच्या प्रमाणानुसारच खतांची मात्रा निश्चित करावी. योग्य माती परीक्षणामुळे उत्पादन खर्चात बचत होण्यासोबतच जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकून राहते, असेही त्यांनी नमूद केले. प्रशिक्षणादरम्यान शेतकऱ्यांना मृदा आरोग्य, अन्नद्रव्य व्यवस्थापन, संतुलित खत वापराचे फायदे तसेच रासायनिक खतांच्या अतिरेकामुळे होणारे दुष्परिणाम याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. शेतकऱ्यांनीही विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

# चार दशकांची पक्षनिष्ठा

## साबेर खान यांना मोठ्या जबाबदारीची अपेक्षा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** वैजापूर शहराच्या राजकारणात गेली चार दशके सक्रिय राहून जनसेवा आणि पक्षनिष्ठेचा आदर्श निर्माण करणारे ज्येष्ठ शिवसेना नेते साबेर खान अमजद खान यांना पक्षाकडून महत्त्वाची जबाबदारी देण्याची मागणी कार्यकर्ते आणि नागरिकांकडून होत आहे.

साबेर खान यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत तब्बल आठ वेळा नगरसेवक म्हणून जनतेचे प्रतिनिधित्व केले आहे. तसेच एकदा नगराध्यक्ष आणि दोनदा उपनगराध्यक्ष म्हणून त्यांनी यशस्वीपणे कामकाज सांभाळले. शहरातील विकासकामे, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता आणि नागरिकांच्या विविध प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

शिवसेनेच्या चढ-उताराच्या काळातही त्यांनी पक्षाशी एकनिष्ठ राहून संघटन मजबूत करण्यासाठी योगदान दिले. निवडणुका, आंदोलने आणि पक्षवाढीसाठी त्यांनी नेहमीच सक्रिय भूमिका बजावली. त्यामुळे ते वैजापूरमधील निष्ठावंत आणि



अनुभवी नेतृत्व म्हणून ओळखले जातात.

सर्वसामान्य नागरिकांशी कायम संपर्क ठेवत गोरगरिबांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे नेते म्हणून साबेर खान यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. पदापेक्षा जनसेवेला प्राधान्य देणाऱ्या त्यांच्या कार्यपद्धतीमुळे आजही अनेक नागरिक त्यांच्यावर विश्वास व्यक्त करतात. त्यांच्या दीर्घकालीन पक्षनिष्ठेची आणि जनाधाराची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांना महामंडळ अथवा अन्य महत्त्वाच्या पदावर संधी द्यावी, अशी मागणी शिवसैनिकांसह नागरिकांकडून होत आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ पक्ष संघटनेला मिळावा, अशी अपेक्षाही कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

# सिद्धपूर वाडीत शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर,** मौजे सिद्धपूर वाडी (ता. वैजापूर) येथे कृषी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न झाला. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, जैविक शेती आणि पीक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.



मा. उपविभागीय कृषी अधिकारी आनंद गंजेवार आणि तालुका कृषी अधिकारी व्यंकट ठक्के यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी आनंद गंजेवार यांनी जैविक खतांच्या वापराचे महत्त्व विशद करताना, जैविक खतांमुळे जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांची संख्या वाढून जमिनीचे आरोग्य सुधारते तसेच रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होते, असे सांगितले. शाश्वत शेतीसाठी सेंद्रिय व जैविक घटकांचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले कृषी विज्ञान केंद्र, छत्रपती संभाजीनगर येथील कृषी शास्त्रज्ञ संजय भवर यांनी आले (अद्रक) पिकाच्या व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच हुमणी अळी नियंत्रण, शून्य मशागत तंत्रज्ञान (SRT) आणि 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' ॲपद्वारे ऑनलाइन खत बुकिंग प्रक्रियेची माहिती देण्यात आली. मेळाव्यानंतर दीपक हारदे व किरण हारदे यांच्या शेतात हुमणी अळी नियंत्रणासाठी प्रकाश सापळ्याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी भाऊसाहेब खेमनर, सहाय्यक कृषी अधिकारी उर्मिला जेजुरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सिद्धपूर, म्हस्की, जांबरगाव, खंबाळा, डवाळा व तिडी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.

# खत खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणीची सक्ती रद्द करा; मनिषा व्यवहारे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** खत खरेदीसाठी राष्ट्रीय खत विक्री ॲपद्वारे ऑनलाईन नोंदणी (बुकिंग) बंधनकारक करण्याचा निर्णय ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी अडचणीचा ठरत असल्याने ही सक्ती तात्काळ रद्द करून पूर्वीप्रमाणे ऑफलाईन पद्धतीनेही खत विक्री सुरू ठेवावी, अशी मागणी भाजपाच्या जिल्हा उपाध्यक्ष यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, आमदार प्रशांत बंब यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, शासनाने राष्ट्रीय खत विक्री ॲपच्या माध्यमातून खत खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी अनिवार्य केली असून त्याची प्रायोगिक अंमलबजावणी छत्रपती संभाजीनगर व कोल्हापूर जिल्ह्यात सुरू करण्यात आली आहे. मात्र ग्रामीण भागातील बहुतांश शेतकरी डिजिटल प्रणाली हाताळण्यात सक्षम नसल्याने त्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

विशेषतः बटाईदार शेतकऱ्यांना जमीनमालकांची कागदपत्रे, संमती व आवश्यक माहिती मिळविण्यासाठी अतिरिक्त वेळ आणि खर्च करावा लागत आहे. तसेच फार्मर आयडी तयार करणे, जमीन व पिकांची माहिती भरणे, क्यूआर कोड किंवा टोकन मिळविण्याची प्रक्रिया सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी गुंतागुंतीची ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.



महिला व ज्येष्ठ शेतकऱ्यांनाही मोबाईल ॲपचा वापर करण्यात अडचणी येत असून अनेक ठिकाणी कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने शेतक-यांना योग्य ते मार्गदर्शन होत नाही त्यामुळे शेतक-यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे त्यांना मुख्यालयी राहणे अनिवार्य करावे. परिणामी, खरीप हंगामाच्या तोंडावर खतांचा पुरवठा वेळेत मिळण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे.

शेतकऱ्यांची ही परिस्थिती लक्षात घेऊन ऑनलाईन नोंदणीची सक्ती शिथिल करण्यात यावी आणि ऑनलाईन व्यवस्थेसोबतच पूर्वीप्रमाणे ऑफलाईन पद्धतीने खत विक्री सुरू ठेवावी, जेणेकरून कोणताही शेतकरी खतापासून वंचित राहणार नाही, अशी मागणी मनिषाताई व्यवहारे यांनी केली आहे.

या मागणीचे निवेदन कृषिमंत्री, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना पाठविण्यात आले आहे.

# प्राजक्त तनपुरे यांच्या विजयाची राहुरीत आज रॅली व सभा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** माजी मंत्री प्राजक्त तनपुरे अहिल्यानगर विधान परिषदेवर बिनविरोध निवड झाल्याबद्दल आज रविवार दि. ७ जून रोजी सायंकाळी ५ वाजता राहुरी येथे भव्य विजयी आभार सभा व रॅलीचे आयोजन अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत आयोजन करण्यात आले आहे.

या रॅलीची सुरुवात कृषी उत्पन्न बाजार समिती राहुरी येथून होणार आहे. तसेच सभेचे आयोजन नवी पेठ येथील जुन्या सरकारी दवाखान्यासमोर, सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास जलसंपदा मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील तसेच जिल्ह्यातील महायुतीचे सर्व आमदार, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## देवस्थान इनाम निर्मूलन कायदा स्थगित

नेत्यांमध्ये चंद्रपूर यवतमाळ भंडारा मध्ये आपल्या उमेदवारांना निवडून आणायची धमक होती का? असा सवाल बावनकुळे यांनी विचारला. जिथे आमचे भरीव मतदान होते, तिथे काँग्रेसचे नेते आपल्या उमेदवाराला निवडून आणू शकत नव्हते. चंद्रपुरात वडेट्टीवार मध्ये धमक होती का आपला उमेदवार निवडून आणण्याची. जर भाजपकडे बहुमत नसते. तर आम्ही निवडणूक देऊन दिली असती. ७०० पैकी ५०० मतदार आमच्याकडे असताना आम्ही कशाला निवडणूकसोडायची असा सवाल त्यांनी केला. मराठा आरक्षणासंदर्भात ओबीसी सब कमिटीची बैठक घेऊन या निर्णयाचा (कालचा जीआर) अभ्यास करणार आहे. आम्हाला ओबीसीच्या ताटातून काढून मराठा समाजाला द्यायचं नाही. सब कमिटी मधील आम्ही सर्व नेते अभ्यास करू आणि जर आम्हाला वाटलं की ओबीसींना कमी सवलत मिळत आहे, तर आम्ही त्याबद्दल सरकार समोर विषय नेऊ. त्या संदर्भात आम्ही तायवाडे, हाके या सर्व ओबीसी नेत्यांशी ही चर्चा करू असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

## कॅरेक्टर खराब करण्याची धमकी देणारा हवालदार लाच घेताना जेरबंद

वर्तणुकीवर मोठ्या प्रमाणात टीका झाली होती. मात्र त्यानंतरही त्यांच्याविरोधात विविध तक्रारी होत असल्याची चर्चा होती. आता लाच स्वीकारताना झालेल्या कारवाईमुळे त्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास जालना एसीबीकडून करण्यात येत आहे. या घटनेमुळे नेकनूर पोलीस ठाणे पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे.

# डिंभेच्या कालव्यात पोहण्यासाठी गेलेला मुलगा वाहून गेला; शोधकार्य सुरू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील महाळुंगे पडवळ पिंगळदरा येथे एक दुर्दैवी घटना घडली आहे. नुकत्याच दहावीत गेलेला प्रज्वल बाळासाहेब चासकर वय १५ हा डिंभे धरणाच्या डाव्या कालव्यात पोहण्यासाठी गेला असताना पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. सायंकाळपर्यंत त्याचा शोध लागलेला नसून बचाव पथकाकडून शोधमोहीम सुरू आहे.

आंबेगाव तालुक्यातील महाळुंगे पडवळ येथील प्रज्वल बाळासाहेब चासकर (वय १५) हा नुकताच नववीची परीक्षा उत्तीर्ण झाला होता. आज दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास तो आपल्या सोहम पडवळ, विराज चासकर, सोहम घोडेकर या मित्रांसह डिंभे धरणाच्या डाव्या कालव्यात पोहण्यासाठी गेला होता. यावेळी पाण्याच्या तीव्र प्रवाहाचा अंदाज न आल्याने प्रज्वल हा कालव्याच्या पाण्यात वाहून गेला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या. तसेच रेस्क्यू टीमला पाचारण करण्यात आले असून कालव्यात आणि परिसरात शोधकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र सायंकाळपर्यंत प्रज्वलचा शोध लागलेला नाही.




# गोंडेगावात पाणी दरांची 'लूट';

## शेजारील गावांच्या तुलनेत दर दुप्पट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर:** तालुक्यातील गोंडेगाव ग्रामपंचायतीच्या जलशुद्धीकरण योजनेतील पाणी दरांबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, शेजारील गावांच्या तुलनेत दुप्पट दर आकारून ग्रामस्थांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे. दरांमध्ये तातडीने कपात न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेना नेते शिवनाथ फोपसे यांनी दिला आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात फोपसे यांनी म्हटले आहे की, गोंडेगावच्या लगत असलेल्या नायगाव ग्रामपंचायतीच्या जलशुद्धीकरण यंत्रावर अवघ्या १० रुपयांत २० लिटर शुद्ध पाणी उपलब्ध करून दिले जाते. तसेच निमगाव खैरी येथील 'वॉटर एटीएम'वरही १० रुपयांत १७ लिटर पाणी नागरिकांना मिळते. मात्र, गोंडेगाव ग्रामपंचायतीच्या 'ॲरो फिल्टर' योजनेत १० रुपयांत केवळ १० लिटर पाणी दिले जात असल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. शासनाकडून विविध पाणीपुरवठा योजनांसाठी निधी उपलब्ध होत असताना गोंडेगाव ग्रामपंचायतीकडून नागरिकांकडून जादा दर आकारले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. इतर ग्रामपंचायती कमी दरात शुद्ध पाणी पुरवत असताना गोंडेगावमध्ये मात्र नागरिकांकडून अधिक पैसे वसूल केले जात असल्याने या दरनिर्धारणामागील कारणांबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.एकाच तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या पाणी दरांमध्ये इतकी मोठी तफावत का आहे, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित करण्यात येत आहे. नायगाव व निमगाव खैरी येथे १० रुपयांत अधिक प्रमाणात पाणी उपलब्ध होत असताना गोंडेगावमध्ये त्याच दरात निम्म्याहून कमी पाणी का दिले जाते, याची चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन गोंडेगाव ग्रामपंचायतीच्या पाणी दरांची चौकशी करावी व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी शिवसेनेने केली आहे. अन्यथा ग्रामस्थांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा शिवनाथ फोपसे यांनी दिला आहे.

# गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामातील सिंचनाचे अंतिम आवर्तन सोडा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कोळपेवाडी :** गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामात आतापर्यंत केवळ एकच आवर्तन सोडण्यात आले आहे. चालू वर्षी उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे फळबागा, चारा पिके व ऊस शेतीचे भवितव्य धोक्यात आले आहे त्यामुळे गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामातील सिंचनाचे अंतिम आवर्तन सोडावे अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात आमदार आशुतोष काळे यांनी पुढे असे म्हटले आहे की,सन २०२५/२६ मध्ये नाशिक व अहिल्यानगर जिल्हयातं सरासरी १५०% पर्जन्यमानाची नोंद झाली असुन त्यामुळे दारणा गंगापुर धरण समुहातील सर्व प्रमुख धरणे नोव्हेंबर २०२५ पर्यंत पुर्ण क्षमतेने भरलेली होती. गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रातही समाधानकारक पाऊस झाला असला तरी झालेल्या पावसात सातत्य नसल्यामुळे पावसाची आकडेवारी जरी जास्त दाखवत असतील तरी भूगर्भ पातळी मात्र चालू वर्षी मोठ्या प्रमाणात घटली आहे त्याचे प्रमुख कारण उष्णतेचे वाढलेले प्रमाण आहे.त्यामुळे साहजिकच त्याचा फटका उभ्या पिकांना बसत असल्याने गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामातील सिंचनाचे आवर्तन सोडणे अत्यंत गरजेचे आहे. गंगापुर धरणातुन गोदावरी कालव्यांना मिळणारे हक्काचे ०१ टीएमसी पाणी यावर्षी सोडण्यात आले नाही. तसेच ०१.८ टीएमसी क्षमता असलेल्या गौतमी-गोदावरी जलाशयातुन व वालदेवी धरणातून देखील गोदावरी कालव्यांसाठी एक थेंबही पाणी सोडण्यात आलेले नाही. उन्हाळी हंगाम ३० जुनपर्यंत सुरु असतांना सद्यस्थितीत शेतकऱ्यांना उभ्या पिकाच्या सिंचनासाठी पाण्याची अत्यंत आवश्यकता आहे. गोदावरी कालव्याच्या लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी आवर्तन देण्यात धरण समुहात आवश्यक पाणी साठा उपलब्ध असल्यामुळे गोदावरी कालव्यांना उन्हाळी आवर्तन देणे शक्य आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणींचा विचार करून गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामातील सिंचनाचे आवर्तन सोडण्याबाबत जलसंपदा विभागाला सूचना द्याव्यात अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी दिलेल्या निवेदनात जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

# श्री शिवाजी महाराज यांना राज्यभिषेक दिन निमित्त अभिवादन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :**हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी .महाराज यांच्या राज्यभिषेक सोहळा दिन निमित्त जेष्ठ शुद्ध षष्ठी शनिवार(ता,०६) जून रोजी येथील नगर पालिकेच्या वैजिनाथ वाचनालयात जेष्ठ नागरिक व वाचक वर्गाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार व पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.रयतेचे जाणते राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्यभिषेक सोहळा म्हणजे जनतेला स्वाभिमान, न्याय व सुराज्य चा नवा मार्ग होय असे या प्रसंगी सांगण्यात आले.या प्रसंगी जेष्ठ वाचक लक्ष्मण राऊत, यु.बी.पारखे, नितीन. जी.शिंदे,धोंडीरामसिंह राजपूत, विजय मिटकरी, केशव क्षीरसागर ,संजय राजपूत यांनी अभिवादन केले. छत्रपती शिवाजी महाराज यांचा व राज्यभिषेक दिन चा जयघोष करण्यात आला.शेवटी ग्रंथालय सहाय्यक एस. व्ही.राजपूत यांनी आभार मानले.



# मराठा समाजाच्या मागण्यांवरील निर्णयांचे स्वागत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर,:** मराठा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या अंमलबजावणी संदर्भात राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांचे स्वागत करत मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे तसेच प्रसाद लाड यांचे आभार मानले आहेत. जरांगे पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मराठा समाजाच्या विविध मागण्यांची अंमलबजावणी करून समाजाला न्याय देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या प्रक्रियेत मुख्यमंत्री फडणवीस, मंत्री विखे आणि आ. प्रसाद लाड यांनी सकारात्मक भूमिका बजावल्याचे त्यांनी नमूद केले.

ओबीसी समाजाप्रमाणे मराठा समाजालाही विविध शासकीय सवलती, सारथी संस्थेअंतर्गत योजना तसेच महामंडळाच्या बंद पडलेल्या काही योजना व अभ्यासक्रम पुन्हा सुरू करण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान बलिदान गेलेल्या कुटुंबांच्या प्रश्नांनाही शासनाने गांभीर्याने हाताळल्याचे सांगत, या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मंत्री राधाकृष्ण विखे यांनी विशेष पुढाकार घेतल्याचे जरांगे यांनी स्पष्ट केले.

मराठा समाजाच्या मागण्या प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत पोहोचविण्यासाठी सरकारच्या वतीने विखे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राधाकृष्ण विखे, प्रसाद लाड आणि संपूर्ण राज्य सरकारचे मी मनापासून आभार मानतो, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

# ओमकार शिंदे अग्नीवीर पदी निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** ओमकार शिंदे भारत सरकारच्या अग्नीवीर पदी निवड झाली असून त्याचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.



वैजापूर तालुक्यातील ओमकार संभाजी शिंदे रा. शिवराई येथील जिल्हा परिषद शाळेचा विद्यार्थी. बारावी कॉमर्स मधून पुढे बीकॉम पदवीधर शिक्षणापर्यंत शिक्षण घेतले व त्यानंतर स्पर्धा परीक्षा तसेच पोलीस भरती तसेच मिल्ट्री भरती अशा वेगवेगळ्या भरतींचे पूर्वतयारी त्याने स्वतः आपल्या बुद्धीवर व शारीरिक मेहनतीच्या व अपार कष्टाच्या बाबीवर भारत सरकारच्या अग्नीवीर या खडतर परीक्षेचा टप्पा यशस्वीरीत्या पार करून अग्नीवीर या भारत देशाच्या संरक्षणासाठी स्वतःला सिद्ध करून झालेल्या भरतीत त्याने यश संपादन केले असून लेखी व मौखिक व मैदानी चाचणी त्यांनी अव्वल स्थान मिळवले असून त्याची निवड अग्निवीर सारख्या. मिल्ट्री विभागात झालेली आहे.

१ जुलै रोजी पुढील प्रशिक्षणासाठी अहिल्यानगर मिल्ट्री कॅम्प ट्रेनिंग सेंटर येथे रवाना होणार आहे त्याच्या यशामागे त्याच्या कुटुंबातील सर्व सदस्यांचे पाठिंब्यामुळे त्याने हे यश संपादन केले. ओमकार संभाजी शिंदे यांनी त्याच्या मेहनतीवर व जिद्द व चिकाटी या बाबीवर हे यश संपादन केले आहे सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे.

## निधन वार्ता

### केशरबाई जाधव



**कुकाणा :** नेवासा तालुक्यातील कुकाणा येथील जुण्या पिढीतील केशरबाई शंकर जाधव (वय ८६) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, दोन विवाहित मुली,नातवंडे असा परिवार असुन शेवगाव येथील पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कुलचे प्रा. मच्छिंद्र जाधव व सोनई सिनियर कॉलेजचे प्रा.डॉ.सुरेश जाधव यांच्या त्या मातोश्री होत.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

रविवार दि. ७ जून २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १६० २५० ७०० | ७-४ | १३० १४९ ४०० | जोड ७६-१४-३२-८०-४५ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२० ६७० ५८० | ३-६ | १२३ २६८ ६०० | जोड ३२-०८-१४-७५-६९ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४० २३० ३८० | ५-८ | १२५ २६० ४४० | जोड ५१-२८-३४-७९-८० |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 09/03/2026 | 2 | | 2 | 1 | | 8 | 5 | | 8 | 2 | | 1 | 3 | | 1 |
| To | 3 | 16 | 4 | 6 | 56 | 8 | 7 | 05 | 8 | 4 | 43 | 4 | 3 | 09 | 3 |
| 13/03/2026 | 6 | | 0 | 8 | | 0 | 8 | | 9 | 8 | | 8 | 4 | | 5 |
| 16/03/2026 | 4 | | 8 | 2 | | 3 | 4 | | 4 | 1 | | 1 | 6 | | 3 |
| to | 5 | 56 | 9 | 0 | 21 | 8 | 6 | 02 | 9 | 2 | 02 | 3 | 7 | 38 | 7 |
| 20/03/2026 | 6 | | 9 | 0 | | 0 | 0 | | 9 | 7 | | 8 | 0 | | 8 |
| 23/03/2026 | 6 | | 3 | 4 | | 1 | 5 | | 7 | 1 | | 2 | 3 | | 1 |
| to | 8 | 34 | 5 | 5 | 46 | 7 | 6 | 03 | 8 | 3 | 46 | 4 | 3 | 64 | 6 |
| 27/03/2026 | 9 | | 6 | 5 | | 8 | 9 | | 8 | 0 | | 0 | 0 | | 7 |
| 30/03/2026 | 2 | | 1 | 1 | | 1 | 2 | | 1 | 1 | | 1 | 1 | | 2 |
| to | 8 | 90 | 3 | 3 | 87 | 6 | 7 | 97 | 1 | 1 | 12 | 5 | 6 | 66 | 5 |
| 03/04/2026 | 9 | | 6 | 4 | | 0 | 0 | | 9 | 9 | | 6 | 9 | | 9 |
| 06/04/2026 | 1 | | 2 | 1 | | 7 | 1 | | 4 | 3 | | 1 | 1 | | 4 |
| to | 3 | 70 | 2 | 4 | 02 | 7 | 3 | 98 | 7 | 5 | 82 | 5 | 2 | 78 | 6 |
| 10/04/2026 | 3 | | 6 | 5 | | 8 | 5 | | 7 | 0 | | 6 | 4 | | 8 |
| 13/04/2026 | 5 | | 1 | 1 | | 6 | 2 | | 5 | 1 | | 8 | 2 | | 1 |
| to | 6 | 06 | 5 | 4 | 43 | 7 | 3 | 45 | 0 | 3 | 77 | 9 | 6 | 85 | 4 |
| 17/04/2026 | 9 | | 0 | 9 | | 0 | 9 | | 0 | 3 | | 0 | 0 | | 0 |
| 20/04/2026 | 5 | | 1 | 8 | | 4 | 1 | | 3 | 5 | | 3 | 3 | | 3 |
| to | 7 | 00 | 2 | 8 | 58 | 5 | 2 | 53 | 5 | 5 | 71 | 8 | 4 | 68 | 7 |
| 24/04/2026 | 8 | | 7 | 9 | | 9 | 2 | | 5 | 7 | | 0 | 9 | | 8 |
| 27/04/2026 | 3 | | 1 | 4 | | 7 | 1 | | 1 | 6 | | 1 | 6 | | 2 |
| to | 5 | 63 | 2 | 4 | 85 | 8 | 6 | 71 | 2 | 7 | 29 | 9 | 8 | 27 | 5 |
| 01/05/2026 | 8 | | 0 | 0 | | 0 | 0 | | 8 | 9 | | 9 | 8 | | 0 |
| 04/05/2026 | 1 | | 3 | 1 | | 6 | 2 | | 2 | 2 | | 2 | 2 | | 2 |
| to | 7 | 71 | 9 | 4 | 34 | 8 | 3 | 48 | 7 | 4 | 25 | 5 | 4 | 66 | 5 |
| 08/05/2026 | 9 | | 9 | 8 | | 0 | 9 | | 9 | 6 | | 8 | 0 | | 9 |
| 11/05/2026 | 5 | | 2 | 3 | | 2 | 6 | | 2 | 1 | | 1 | 4 | | 1 |
| to | 6 | 79 | 7 | 7 | 04 | 3 | 0 | 68 | 3 | 9 | 01 | 2 | 7 | 85 | 5 |
| 15/05/2026 | 6 | | 0 | 0 | | 9 | 0 | | 3 | 0 | | 8 | 7 | | 9 |
| 18/05/2026 | 8 | | 4 | 5 | | 1 | 1 | | 1 | 7 | | 4 | 2 | | 2 |
| to | 9 | 79 | 5 | 6 | 96 | 7 | 4 | 22 | 2 | 8 | 30 | 8 | 8 | 93 | 5 |
| 22/05/2026 | 0 | | 0 | 8 | | 8 | 7 | | 9 | 8 | | 8 | 9 | | 6 |
| 25/05/2026 | 5 | | 2 | 3 | | 1 | 8 | | 4 | 1 | | 2 | 4 | | 5 |
| to | 6 | 11 | 9 | 4 | 37 | 3 | 9 | 78 | 6 | 9 | 05 | 5 | 6 | 06 | 5 |
| 29/05/2026 | 0 | | 0 | 6 | | 3 | 0 | | 8 | 0 | | 8 | 0 | | 6 |
| 01/06/2026 | 4 | | 1 | 9 | | 1 | 2 | | 5 | 1 | | | | | |
| to | 4 | 89 | 3 | 9 | 80 | 2 | 6 | 82 | 7 | 21 | | | | | |
| 05/06/2026 | 0 | | 5 | 0 | | 7 | 0 | | 0 | 8 | | | | | |

द • ख • ल



## तलवारीने दहशत माजवणारा जेरबंद

**अहिल्यानगर :** सैनिक लॉन ते जुने कलेक्टर ऑफिस रस्त्यावर धारदार तलवारीसह दहशत निर्माण करणाऱ्या एका इसमाला कोतवाली पोलिसांनी रंगेहाथ अटक केली आहे. संतोष राजू गाडे (वय ४१, रा. तांबे मळा, बुरुडगाव, अहिल्यानगर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सूरज दिलीप कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोतवाली पोलीस ठाण्याचे तपास पथक परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी गस्त घालत होते. त्याच वेळी सैनिक लॉन परिसरात एक व्यक्ती हातात धारदार तलवार घेऊन फिरत असल्याची माहिती पोलीस निरीक्षकांना मिळाली. त्यांनी तातडीने तपास पथकाला कारवाईचे आदेश दिले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत संशयित आरोपी संतोष गाडे याला ताब्यात घेतले. पंचांसमक्ष त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे लोखंडी तलवार मिळून आली. पोलिसांनी शस्त्र जप्त करून आरोपीविरुद्ध शस्त्र कायद्यान्वये गुन्हा नोंदवला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, प्रवीण पाटील आणि त्यांच्या पथकाने केली.

# गोदावरी महामंडळ कार्यालय स्थलांतराचा विखेंचा 'बालहट्ट'!

## निर्णय मागे न घेतल्यास संघर्ष अटळ : खा. लंके

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर : गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारीतील महत्त्वाच्या विभागीय कार्यालयांचे अहिल्यानगरमधून लोणी येथे स्थलांतर करण्याचा निर्णय हा शासनाची कोणतीही पूर्वमान्यता न घेता घेतलेला असून तो पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा 'बालहट्ट' असल्याची घणाघाती टीका खा. नीलेश लंके यांनी केली. हा निर्णय तातडीने मागे घेण्यात आला नाही तर शेतकरी, कर्मचारी आणि नागरिकांच्या सहभागातून व्यापक लोकआंदोलन उभारले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.**

अहिल्यानगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना खा. लंके यांनी गोदावरी खोरे महामंडळाच्या कार्यालय स्थलांतराच्या प्रस्तावावर तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी नगरसेवक योगीराज गाडे, अशोक बाबर उपस्थित होते.

कार्यालय स्थलांतरामागे वेगळाच हेतू असल्याची शंका उपस्थित करताना लंके म्हणाले की, कार्यकारी अभियंता अहिल्यानगर पाटबंधारे विभाग आणि मुळा पाटबंधारे विभागाची कार्यालये लोणी येथे हलविण्याचा घाट घातला जात आहे. जलसंपदा विभागांतर्गत कार्यरत असलेल्या गोदावरी व कृष्णा सिंचन विकास महामंडळांचा कारभार पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आहे. सिंचन प्रकल्पांची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या या महामंडळांवर शासनाचे नियंत्रण असताना शासनाला विश्वासात न घेता स्थलांतराचा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

ते म्हणाले, ज्या ठिकाणी कार्यालये हलविण्याचा प्रस्ताव आहे, तेथे स्वतंत्र प्रशासकीय इमारत नाही, कर्मचाऱ्यांसाठी निवास व्यवस्था नाही आणि आवश्यक पायाभूत सुविधांचाही अभाव आहे. अशा परिस्थितीत हा निर्णय कर्मचाऱ्यांच्या किंवा शेतकऱ्यांच्या हिताचा नसून त्यामागे काही वेगळाच हेतू असल्याची शंका निर्माण होते. श्रीरामपूरमध्ये जसे काही प्रकार घडले, त्याच धर्तीवर या जागा एखाद्या खाजगी संस्थेला देण्याचा डाव तर नाही ना, असा प्रश्न निर्माण होत आहे.



या संपूर्ण प्रकरणाची माहिती राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे दिली असून शासनाने तातडीने हस्तक्षेप करून स्थलांतर प्रक्रिया थांबवावी, अशी मागणी आपण केली असल्याचे लंके यांनी सांगितले. निर्णय कायम ठेवण्याचा प्रयत्न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र संघर्ष उभारला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

अहिल्यानगर पाटबंधारे विभागाचे कार्यालय १९३० पासून जिल्हा मुख्यालयात कार्यरत आहे, तर मुळा पाटबंधारे विभागाचे कार्यालय १९५२ पासून येथेच कार्यरत आहे. या कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात अकोले, संगमनेर, राहाता, राहुरी, नेवासा, शेवगाव, पाथर्डी आणि पारनेर या तालुक्यांचा समावेश आहे. त्यामुळे शेतकरी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी जिल्हा मुख्यालयातील ही कार्यालये अधिक सोयीची असल्याचे त्यांनी नमूद केले.

कोणतीही लोकमागणी नसताना तब्बल नऊ दशकांची प्रशासकीय परंपरा असलेली कार्यालये हलविण्याचा हट्ट का धरला जात आहे? असा सवाल उपस्थित केला.

स्थलांतरामुळे नागरिकांना अतिरिक्त प्रवास करावा लागेल, वेळ आणि पैशांचा अपव्यय होईल तसेच शेतकऱ्यांच्या कामांमध्ये अडथळे निर्माण होतील. यापुढेही अशाच प्रकारे शासकीय कार्यालये हलविण्याचे प्रयत्न होऊ शकतात, अशी भीती व्यक्त करताना लंके म्हणाले, आज पाटबंधारे विभागाची कार्यालये हलविली जात आहेत. उद्या जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद किंवा इतर महत्त्वाची शासकीय कार्यालयेही स्थलांतरित करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन याला विरोध करणे आवश्यक आहे.

वैद्यकीय महाविद्यालयाच्या मुद्द्यावरूनही त्यांनी पालकमंत्री विखे पाटील यांच्यावर निशाणा साधला. नगरसाठी मंजूर झालेले वैद्यकीय महाविद्यालय अन्यत्र वळविण्याचा प्रयत्न झाला होता, मात्र केंद्रीय समितीसमोर ठाम भूमिका मांडल्यामुळे ते नगरमध्येच राहिले, असा दावा त्यांनी केला. जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक प्रश्न प्रलंबित असताना विकासकामांऐवजी कार्यालयांचे स्थलांतर करण्यावर भर दिला जात असल्याची टीका करताना त्यांनी जिल्ह्यातील विकासाच्या असमतोलावरही प्रश्न उपस्थित केले. पंतप्रधान आले तर शिर्डीत, गृहमंत्री आले तर शिर्डीत आणि संरक्षणमंत्री आले तर लोणीत येतात. मग कर्जत, जामखेड, पारनेर आणि इतर भागांकडे दुर्लक्ष का केले जाते? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. संरक्षण विभागाच्या जमिनी उपलब्ध असतानाही त्या परिसरात संरक्षणविषयक उद्योग किंवा प्रकल्प न आणल्याचा आरोप करत त्यांनी राहुरी-ढवळपुरी परिसरातील युवकांच्या रोजगाराच्या संधींकडे दुर्लक्ष झाल्याचे म्हटले.

## छ. शिवाजी महाराजांचे कार्य प्रेरणादायी : महापौर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात झालेल्या या कार्यक्रमात शिवरायांच्या कार्याचा गौरव करण्यात आला तसेच त्यांच्या विचारांचे स्मरण करून स्वराज्याच्या आदर्शांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना महापौर ज्योतीताई गाडे, महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप उपस्थित होते.

यावेळी बोलताना महापौर ज्योती गाडे म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती-धर्मातील लोकांना सोबत घेऊन लोककल्याणकारी आणि न्यायप्रिय असे रयतेचे राज्य निर्माण केले. समाजातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविणे, महिलांचा सन्मान राखणे, शेतकरी आणि कष्टकरी वर्गाला न्याय देणे तसेच सर्व धर्मांचा आदर राखत सुशासन निर्माण करणे हा शिवरायांच्या राज्यकारभाराचा मूलमंत्र होता. त्यामुळेच आजही त्यांचे कार्य संपूर्ण जगासाठी आदर्श मानले जाते. त्या पुढे म्हणाल्या की, रायगड किल्ल्यावर पार पडलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा हा केवळ एका राजाचा राज्याभिषेक नव्हता, तर तो मराठी माणसाच्या स्वाभिमानाचा, आत्मसन्मानाचा आणि स्वातंत्र्याच्या विचारांचा विजय होता.

## भिंगार येथील रात्रीच्या शाळेत घरफोडी

**अहिल्यानगर :** जवळील भिंगार येथील कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका रात्रीच्या शाळेचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला आणि एकूण १९ हजार ५०० रुपये किमतीचे विविध साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अंजुम सगीर शेख यांनी कॅम्प पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादिवरून घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भिंगार येथील स्नेहालय संस्थेद्वारे चालवल्या जाणाऱ्या ऊर्जा बाल भवन अंतर्गत असलेल्या रात्रीच्या शाळेत ही चोरीची घटना घडली. दि. ४ जून रोजी रात्री ८.३० ते दि. ५ जून रोजी सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोराने शाळेच्या मुख्य दरवाजाचा कडी-कोयंडा कशाच्या तरी साहाय्याने तोडला. चोराने स्वतः च्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीरपणे आत प्रवेश करून खोलीत ठेवलेले साहित्य चोरून नेले. चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये १० हजार रुपये किमतीचा एक दूरदर्शन संच (टीव्ही), ८ हजार रुपये किमतीची ध्वनिक्षेपक यंत्रणा (स्पीकर) व सोन्याच्या रंगाची ध्वनिवर्धक नळी (माईक), ५०० रुपयांचा स्टीलचा पिपा (ड्रम), २०० रुपयांची स्टीलची कळशी, ३०० रुपयांची विजेची तार आणि ५०० रुपये किमतीच्या तीन लोखंडी चौकटींचा समावेश आहे. एकूण १९ हजार ५०० रुपयांचा हा मुद्देमाल घेऊन चोर पसार झाला. पोलीस हवालदार एस. एस. शेख या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## छ. शिवरायांना अभिप्रेत असलेली जनतेची कामे प्रशासनाकडून व्हावीत : जिल्हाधिकारी डॉ. आशिया

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** अतिशय धाडसी सेनानी असलेले छत्रपती शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. आजच्या इतके तंत्रज्ञान नसताना त्यांना आदर्श राज्यकारभार चालवला. सर्वसामान्यांना अपेक्षित राजसत्ता त्यांनी दाखवून दिली. त्यांच्या राज्याभिषेक दिन हा शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा केला होता. प्रशासक म्हणूनही छत्रपतींच्या कार्यापासून प्रेरणा घेणे आवश्यक आहे. सर्वसामान्यांवर कदापि अन्याय होऊ नये हीच त्यांची भूमिका असायची महाराज अष्टप्रधानमंडळ चालवायचे. निर्णय घेताना ते अष्टप्रधान मंडळाचा सल्ला घेऊन रयतेचे हित कशात आहेत हे त्यांनी पाहिले. कोणत्याही नागरिकाला प्रशासनाचा जाच होणार नाही, ही बाब महत्वाची आहे. याच संकल्पनेनुसार सध्या शासन आपल्या दारी अभियान राबविण्यात येत आहे. प्रशासनाची सजगता लोकापर्यंत पोहचली पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले. राज्य शासनाच्या निर्देशानुसार दरवर्षी ६ जून हा शिवस्वराज्यभिषेक दिन शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

## जीएसटी विभागात ३ कोटी ८७ लाखांचा अपहार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर येथील राज्य वस्तू व सेवाकर (जीएसटी) विभागामध्ये एक खळबळजनक प्रकार उघडकीस आला असून, शासनाची तब्बल ३ कोटी ८७ लाख ११ हजार ८५९ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी एका शासकीय अधिकाऱ्यावर कॅम्प पोलीस स्टेशन, भिंगार येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी वस्तू व सेवाकर विभागाचे अधिकारी हेमंत लक्ष्मण गांगे यांनी अधिकृत फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून संशयित आरोपी प्रकाश लक्ष्मण चव्हाण (रा. शृंगार निवास, गुलमोहर रोड, अहिल्यानगर) याच्याविरुद्ध शासकीय रकमेचा अपहार आणि फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी प्रकाश चव्हाण हा अहिल्यानगर कार्यालयात कार्यरत असताना, त्याने आपल्या पदाचा गैरवापर केला. कार्यालयाचे कोणतेही रेकॉर्ड व्यवस्थित न ठेवता,

### मुलाच्या खात्यावर रक्कम वर्ग : अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल

संगणक प्रणालीवरील महाविकास सांकेतांकाचा वापर करून आपल्या अधिकृत युझर आयडी आणि पासवर्डद्वारे मूल्यवर्धित कर कायद्यांतर्गत तब्बल ४४ चलनांमध्ये व्यापाऱ्यांच्या दुरुस्ती अर्जाशिवाय बेकायदेशीर फेरफार केले. स्वतः च्या आर्थिक फायद्यासाठी त्याने शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसुलावर डल्ला मारला.

तसेच एका पेट्रोलियम व्यापाऱ्याने भरलेला १ लाख ३० हजार ५०२ रुपयांचा कर आरोपीने स्वतःचा मुलगा अक्षय चव्हाण याच्या 'नक्ष हॉटेल'च्या खात्यावर परस्पर वर्ग करून शासनाची फसवणूक केली. या प्रकरणी भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, कॅम्प पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक मुलगीर या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

## पुणे बसस्थानकावर धाडसी चोरी परप्रांतिय चोरटा गजाआड

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जामखेड येथील एका महिला प्रवाशाची पैशांची पर्स आणि मोबाईल हिसकावून पळणाऱ्या दोन चोरट्यांपैकी एकाला सहप्रवाशांच्या मदतीने रंगेहात पकडण्यात आले. ही थरारक घटना अहिल्यानगर येथील पुणे बसस्थानकावर घडली. नागरिकांनी पकडलेल्या चोरट्याला पोलिसांच्या स्वाधीन केले असून, त्याचा दुसरा साथीदार मुद्देमाल घेऊन पळून जाण्यात यशस्वी झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जामखेड येथील रहिवासी रंजना अंकुश तनपुरे या त्यांच्या मुलीला भेटण्यासाठी संभाजीनगरला जात होत्या. सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास त्या पुणे बसस्थानकावरून संभाजीनगर बसमध्ये बसल्या. यावेळी दोन अनोळखी चोरट्यांनी त्यांच्या बॅगची उचकापाचक सुरू केली. रंजना यांनी प्रसंगावधान राखून आरडाओरडा केला. चोरट्यांनी बॅग हिसकावून पळ काढण्याचा प्रयत्न केला असता, रंजना यांनी एका सहप्रवाशाच्या मदतीने एका चोरट्याला जागीच पकडले. मात्र, त्याने झटापट करून बॅग दुसऱ्या साथीदाराकडे फेकली आणि तो साथीदार पळून गेला. पकडलेल्या चोरट्याचे नाव वाहीद अब्दुल खान (राहणार सराई छबीला, जिल्हा बुलंदशहर, उत्तर प्रदेश) असे आहे. या चोरीमध्ये रंजना यांचे अठरा हजार रुपये रोख आणि पाच हजार रुपयांचा मोबाईल फोन, असा एकूण तेवीस हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. रंजना यांनी तात्काळ पोलीस मदतीसाठी ११२ क्रमांकावर फोन केला. कोतवाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपी वाहीद खान याला ताब्यात घेतले. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पळून गेलेल्या दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू केला आहे.

# पर्यावरण दिनानिमित्त वृक्षसंवर्धन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** पीपल्स हेल्पलाईनचे सामाजिक कार्यकर्ते प्रकाश थोरात यांच्या सामाजिक कार्याबद्दल हेल्पिंग हॅण्ड फाऊंडेशनच्या नर्सिंग कॉलेजच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. समाजातील वंचित, दुर्बल, पीडित आणि अन्यायग्रस्त घटकांच्या हक्कांसाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला. यावेळी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हेल्पिंग हॅण्ड फाऊंडेशनच्या प्रमुख निर्मलाताई केदारी होत्या. त्यांच्या हस्ते थोरात यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी फाऊंडेशनचे पदाधिकारी, नर्सिंग कॉलेजचे प्राध्यापक, विद्यार्थी तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात निर्मलाताई केदारी यांनी प्रकाश थोरात यांच्या सामाजिक कार्याचे विशेष कौतुक केले. त्या म्हणाल्या की, समाजातील गरजू, वंचित आणि अन्यायग्रस्त नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी थोरात यांनी सातत्याने संघर्ष केला आहे. समाजहितासाठी निस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमुळेच सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया अधिक बळकट होत असते.

अशा व्यक्तींचा सन्मान करणे म्हणजे समाजसेवेच्या मूल्यांचा गौरव करण्यासारखे असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बोलताना निर्मलाताई केदारी यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. वाढते प्रदूषण, जंगलतोड, हवामान बदल आणि पाणीटंचाई यांसारख्या समस्या संपूर्ण जगासमोर गंभीर आव्हान म्हणून उभ्या राहिल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संरक्षणासाठी आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, प्लास्टिकचा वापर कमी करावा, पाणी आणि विजेची बचत करावी तसेच स्वच्छतेच्या सवयी अंगीकाराव्यात, असे आवाहन त्यांनी केले. सत्काराला उत्तर देताना प्रकाश थोरात यांनी हेल्पिंग हॅण्ड फाऊंडेशन व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. त्यांनी आपल्या मनोगतात संविधानिक मूल्यांचे महत्त्व, सामाजिक न्यायाची आवश्यकता, शिक्षणाची भूमिका आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी याविषयी मार्गदर्शन केले. समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी युवकांनी पुढाकार घेत सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

## अतिक्रमणाची तक्रार केल्याने कारवर दगडफेक

**अहिल्यानगर :** सावेडी परिसरातील नगर-मनमाड रोडवर अतिक्रमणाची तक्रार केल्याने एका किराणा दुकानदाराची कार अडवून त्यावर पाठीमागून दगडफेक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी संतोष नामदेव वाकळे (रा. वाकळे मळा, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी सोपान भगवान वाकळे, किशोर भगवान वाकळे, प्रसाद सुरेश वाकळे (तिघे रा. अर्जुन वॉशिंग सेंटर शेजारी, सावेडी) आणि केतन ठाणगे (रा. तपोवन रोड, सावेडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी संतोष वाकळे यांचे सावेडी येथील आरोग्य सदन हॉस्पिटलसमोर किराणा दुकान आहे. त्यांचे चुलत भाऊ सोपान वाकळे आणि किशोर वाकळे यांच्याशी गेल्या पाच वर्षांपासून जमिनीच्या जागेवरून वाद सुरू आहे. त्यांनी महानगरपालिकेत अतिक्रमणाची तक्रार केली होती. २१ मे २०२६ रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास संतोष वाकळे हे आपले किराणा दुकान बंद करून त्यांच्या महिंद्रा मराझो कार (क्र. एम.एच.-१६-ईएन-७१४३) घरी जात होते. नगर-मनमाड रोडवरील सत्यम कॉम्प्लेक्सजवळ आले असता, आरोपी सोपान वाकळे याने गाडी अडवण्यासाठी रस्त्याच्या मधोमध उभे राहून हात केला. मात्र, फिर्यादीने गाडी न थांबवता पुढे नेली. याचा राग आल्याने सोपान याने गाडीच्या काचेवर हाताने मारले आणि गाडी पुढे गेल्यानंतर मागून जाणीवपूर्वक दगड फेकून मारला, ज्यामुळे कारचे नुकसान झाले. त्याच वेळी थोडे पुढे किशोर वाकळे आणि प्रसाद वाकळे हे त्यांच्या मोपेड व इलेक्ट्रिक मोटरसायकलसह रस्त्याच्या बाजूला दबा धरून थांबले होते. फिर्यादीने तेथून कशीबशी आपली कार काढत घर गाठले. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल गोपीनाथ गोरडे करत आहेत.

# पोलिसांच्या कथित हलगर्जीपणामुळे शेतकऱ्याची आत्महत्या?

## बेलवंडी पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** बेलवंडी पोलीस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळेत न्याय न देता वारंवार अपमानास्पद वागणूक दिल्याने आणि तक्रारीची दखल न घेतल्याने माझे पती किरतमल झरलाल चव्हाण यांनी नैराश्यातून आत्महत्या केल्याचा गंभीर आरोप मृताच्या पत्नी शैलाबाई किरतमल चव्हाण यांनी केला आहे. या प्रकरणातील संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करून त्यांना निलंबित करावे, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शैलाबाई चव्हाण या श्रीगोंदा तालुक्यातील घोटवी गावच्या रहिवासी असून, त्या पती व दोन मुलांसह शेती आणि मोलमजुरी करून उदरनिर्वाह करत होत्या. त्यांच्या निवेदनानुसार, शेजारी राहणारे भावबंधू यांच्याशी मागील काही वर्षांपासून वाद सुरू होता.



दि. २२ एप्रिला दुपारी साडेतीनच्या सुमारास त्यांचे भावबंधू यांनी दारूच्या नशेत शैलाबाई व त्यांचे पती किरतमल चव्हाण यांना शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. वाद टाळण्यासाठी दोघे शेतात कांदे काढण्यासाठी जात असताना सदर व्यक्तीने त्यांचा रस्ता अडवून मारहाण केली. या हल्ल्यात शैलाबाई यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यातून रक्तस्राव सुरू झाला होता. तसेच जीवे मारण्याची व संपूर्ण कुटुंब संपवून टाकण्याची धमकीही दिल्याचे निवेदनात म्हटले आहे.

घटनेनंतर त्याच दिवशी सायंकाळी सुमारे सात वाजता पती-पत्नी बेलवंडी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देण्यासाठी गेले. मात्र, तेथे उपस्थित असलेल्या एका महिला पोलीस कर्मचाऱ्याने त्यांची तक्रार न घेता अपमानास्पद शब्दांत बोलल्याचा आरोप करण्यात आला आहे. उद्या सकाळी या आज तक्रार घेता येणार नाही, असे सांगून त्यांना परत पाठवण्यात आल्याचे शैलाबाई यांनी म्हटले आहे. यामुळे निराश होऊन दोघे घरी परतले. मात्र, रात्री पुन्हा भावबंधू यांची पत्नी आणि मुलांनी मिळून मारहाण केली. या घटनेचा व्हिडिओ भीतीपोटी त्यांच्या लहान मुलाने मोबाईलमध्ये रेकॉर्ड केल्याचेही निवेदनात नमूद आहे.

दुसऱ्या हल्ल्यानंतर रात्री सुमारे दहा वाजता किरतमल चव्हाण पुन्हा पोलीस स्टेशनमध्ये गेले. मात्र, पोलीस निरीक्षक यांनी तांत्रिक कारण सांगून तक्रार घेण्यास नकार दिला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी, २३ एप्रिल रोजी सकाळी पुन्हा तक्रार देण्यासाठी गेल्यानंतरही एका पोलीस अधिकाऱ्याने शिवीगाळ करून हाकलून दिले. यानंतर संबंधितांकडून वारंवार धमक्या दिल्या जात होत्या. पोलीस आम्ही विकत घेतले आहेत, आमचे काहीही वाकडे होणार नाही, असे सांगून मानसिक छळ सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या सततच्या त्रासामुळे शैलाबाई व त्यांचे पती माहेरी राहण्यासाठी गेले होते. दरम्यान, ३० एप्रिला भावबंधू याने त्यांच्या मुलाला धमकीचा रील पाठविला. हा प्रकार समजल्यानंतर किरतमल चव्हाण अधिकच मानसिक तणावाखाली गेले. पोलीस मदत करत नाहीत. विरोधकांनी पोलीस विकत घेतले आहेत, अशी खंत त्यांनी कुटुंबीयांजवळ व्यक्त केल्याचे शैलाबाई यांनी निवेदनात म्हटले आहे. अखेर वाढत्या नैराश्यातून ३० एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ७.४५ वाजता किरतमल चव्हाण यांनी विहिरीत उडी मारून आत्महत्या केल्याचा दावा करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, बेलवंडी पोलीस स्टेशनमधील संबंधित तारखांचे सीसीटीव्ही फुटेज जप्त करून तपासण्यात यावे, तसेच पोलीस निरीक्षक आणि संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवर तात्काळ विभागीय कारवाई करून त्यांना निलंबित करावे, अशी मागणी शैलाबाई चव्हाण यांनी प्रशासनाकडे केली आहे.

दखल

## आमदार अमोल खताळ यांची श्री काळभैरवनाथ देवस्थानाला भेट

**आळेफाटा :** संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ यांनी जुन्नर तालुक्यातील खामुंडी येथील श्री काळभैरवनाथ देवस्थानाला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान देवस्थान ट्रस्ट व गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. श्री काळभैरवनाथाचे दर्शन घेतल्यानंतर आमदार खताळ यांनी मंदिर परिसराची पाहणी केली. त्यांनी देवस्थानच्या विकासकामांबाबत ट्रस्ट पदाधिकाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली. भेटीदरम्यान उपस्थित भाविकांशी त्यांनी संवाद साधत गावाच्या समस्या ऐकून घेतल्या. यावेळी बोलताना आमदार खताळ म्हणाले, ''खामुंडीचे श्री काळभैरवनाथ देवस्थान



हे जुन्नर परिसरातील श्रद्धेचे महत्त्वाचे केंद्र आहे.ग्रामस्थांनी एकत्र येऊन देवस्थानची जोपासना करणे हीच खरी भक्ती आहे.'' या वेळी देवस्थान ट्रस्टचे खजिनदार मारुती कदम , विश्वस्त अरुण बोडके, गणपत कोकाटे,शहाजी जाधव,व्यवस्थापक बबन डुंबरे सामाजिक कार्यकर्ते कैलास बोडके, केशव क्षीरसागर, सह्याद्री करिअर अकॅडमीचे मयुर डुंबरे आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. गावात आलेल्या लोकप्रतिनिधीचा सन्मान करण्याची स्थानिक परंपरा यानिमित्ताने पुन्हा एकदा दिसून आली. जुन्नर तालुक्यातील खामुंडी येथील श्री काळभैरवनाथ मंदिर भाविकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे . आमदारांच्या या भेटीने गावात उत्साहाचे वातावरण होते.

## शिवराज्याभिषेक दिनानिमित्त सासवड येथे छत्रपती शिवरायांना अभिवादन

**माळशिरस :** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५३ वा शिवराज्याभिषेक दिन आज ६ जून रोजी सर्व महाराष्ट्रात उत्साहात साजरा होत असताना सासवड येथील शिवतीर्थ चौकातील छत्रपती शिवरायांच्या पूर्णाकृती पुतळ्यास दिवसभर हजारो शिव भक्तांनी उपस्थित राहून अभिवादन केले.



सकाळी माजी आमदार संजय जगताप यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. याप्रसंगी गारद पुकारून छत्रपती शिवराय व छत्रपती संभाजी महाराजांचा उपस्थितांनी जयघोष केला.जिल्हा परिषद सदस्य हरिभाऊ लोळे,उप नगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, आरोग्य समिती सभापती राजनभय्या जगताप, पाणी पुरवठा सभापती माऊली गिरमे, नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप,ऍड सौरभ वढणे सागर जगताप, प्रा निलेश जगताप, तुषार जगताप, नंदूबापू जगताप, डॉ मनोज शिंदे सुहास जगताप यांसह मोठ्या संख्येने शिवप्रेमी उपस्थित होते. येथील श्रीमंत गोदाजीराजे जगताप यांच्या अर्धपुतळ्याला देखील पुष्पहार अर्पण करण्यात आला दरम्यान दिवसभर शिवतीर्थ चौकात पोवाडे आणि छत्रपतींच्या स्फूर्ती गीतांनी वातावरण शिवमय झाले होते.

## पूर्व आंबेगावात पुनवर्सन संपादित जमिनीवर दलालांच डोळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यात पुनर्वसन विभागाच्या संपादित जमिनींवर दलालांचा (एजंट) डोळा असून, एकाच व्यक्तीला दोन वेगवेगळ्या गावांत जमिनीचे दुबार वाटप होत असल्याचे धक्कादायक प्रकार पोंदेवाडी लाखणगाव मध्ये समोर येत आहेत या गंभीर घोटाळ्याची सखोल चौकशी करून, महसूल विभागाने यात लक्ष घालावे आणि भ्रष्ट एजंट व अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी आंबेगाव तालुका ख. वि. संघाचे माजी अध्यक्ष अनिल वाळुंज यांनी केली आहे एकाच प्रकल्पबाधित किंवा पात्र व्यक्तीला नियमांचे उल्लंघन करून दोन वेगवेगळ्या गावांमध्ये जमिनीचे वाटप होत असल्याचे प्रकार घडत आहेत. यामुळे खऱ्या लाभार्थ्यांवर अन्याय होत असून, दलाल यातून आर्थिक फायदा लाटत आहेत सदर जमीनीमध्ये दलालांचा हस्तक्षेप वाढला असून जमीन वाटपाची प्रक्रिया पूर्ण होऊन अधिकृत 'फेरफार' होण्याआधीच, काही एजंट व दलाल परस्पर जमिनीची खरेदी-विक्री करत आहेत. कागदपत्रांमधील त्रुटी आणि हिशोबातील गोंधळाचा गैरफायदा घेऊन बनावट कागदपत्रे तयार केली जात आहे महसूल व पुनर्वसन विभागाने तात्काळ या प्रकरणाची दखल घ्यावीव संबंधित दोषींवर करावी जिल्हा पुनर्वसन कार्यालय आणि त्याशी संबंधित विभागांच्या दप्तरांची (रेकॉर्ड) चौकशी करण्यात यावी तसेच चुकीच्या पद्धतीने वाटप झालेल्या जमिनींचे फेरफार रद्द करून, दोषींवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी अनिल वाळुंज यांनी महसूल व पुनर्वसन विभागाकडे केली आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांनी केली नुकसानग्रस्त केळी पिकाची पाहणी

## राज्यशासनाच्यावतीने लवकरात लवकर मदत करण्यात येईल-उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** तालुक्यात शुक्रवारी (५ जून) झालेल्या वादळी पावसामुळे कऱ्हाटी परिसरात केळी पिकाचे नुकसान झाले, या पार्श्वभूमीवर राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी प्रत्यक्ष केळी पीक क्षेत्रावर जावून झालेल्या नुकसानीबाबत पाहणी केली. यावेळी अधिकाऱ्यांकडून झालेल्या नुकसानीबाबत माहिती घेतली. तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधून राज्यशासनाच्यावतीने लवकरात लवकर मदत करण्यात येईल, असेही श्रीमती पवार म्हणाल्या. यावेळी उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे, तहसीलदार स्वप्नील रावडे, तालुका कृषी अधिकारी सचिन हाके परिसरातील शेतकरी, लोकप्रतिनिधी आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, बधितांना नुकसानभरपाईची रक्कम लवकरात लवकर मिळण्याच्यादृष्टीने बाधित क्षेत्राचे तात्काळ पंचनामे करण्याचे जिल्हा प्रशासनाला निर्देश देण्यात आले असून त्यादृष्टीने प्रशासनाच्यावतीने काम केले जात आहे. राज्य शासन संकटाच्या काळात नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे असते. त्यामुळे धीर धरा, खचून जावू नका, असे श्रीमती पवार म्हणाल्या. श्रीमती पवार यांनी मौजे माळवाडी (लोणी) येथे २ जून रोजी झालेल्या वादळात पत्र्याच्या शेड पडून मयत झालेल्या नंदाबाई जनार्धन लडकत यांच्या कुटुंबियांचे भेटून सांत्वन केले. यावेळी उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते कुटुंबियांना नुकसान भरपाई रक्कम म्हणून ४ लाख रुपये व २ शेळयांना ८ हजार रुपयाचा धनादेश सुपूर्द करण्यात आले. यावेळी प्रल्हाद पांडुरंग लडकत यांना १६ हजार रुपये, बाळासाहेब अमृता लडकत यांना ८ हजार रुपये आणि नंदा प्रताप फरांदे यांना १२ हजार रुपयांचा नुकसान भरपाईबाबतचा धनादेश सुपूर्द करण्यात आले.

मौजे गुणवडी येथील राधा रवीन आगवणे यांचे घराचे पत्रे वादळी वाऱ्यामुळे उडाले आहेत, मौजे कऱ्हाटी येथे नारायण लोणकर यांच्या शेतात सुमारे संख्या २५० ते ३०० केळी पिकाचे नुकसान झाले आहे. मौजे मोडवे येथील गुलाब मोटे यांच्या १० शेळ्या, तिन मेंढ्या व १ कुत्रा वीज पडून मयत झालेले आहेत. तालुक्यातील ४ गावात १६९ शेतकऱ्यांचे ९५ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झालेले आहे.

### कृषी मंत्र्यांकडूनही काटेवाडी परिसरात पिकांची पाहणी...

तत्पूर्वी राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी काटेवाडी परिसरातील नुकसानग्रस्त भागांची पाहणी करुन शेतकऱ्यांशी संवाद साधला. अधिकाऱ्यांकडून झालेल्या नुकसानीबाबत माहिती घेतली.

## नवनियुक्त दप्तर कारकून कालवा निरीक्षक व मोजणीदार यांच्या प्रशिक्षणास एक महिना पूर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** नारायणगाव ता. जुन्नर येथे सुमारे ११ वर्षाच्या कालावधीनंतर कुकडी पाटबंधारे विभाग क्रमांक एक कार्यकारी अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेले नवनियुक्त कार्यरत दप्तर कारकून, कालवा निरीक्षक व मोजणीदार व यांच्या सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षणास एक महिना पूर्ण झाला आहे. कार्यकारी अभियंता गणेश नान्नोर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षक मा. उपविभागीय अधिकारी सुहास साळवे हे या सर्व प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देत आहेत. याबाबत माहिती अशी की , जलसंपदा विभागाचे नारायणगाव येथील कुकडी पाटबंधारे विभाग क्रमांक १ हे महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागांतर्गत कुकडी प्रकल्पाचे प्रमुख कार्यकारी कार्यालय आहे. या प्रकल्प कार्यालय अंतर्गत काम करणारे अनेक कालवा निरीक्षक ,मोजणीदार व दप्तर कारकून असून या सर्व कर्मचाऱ्यांना कार्यालयीन व क्षेत्रीय कामकाजाच्या प्रशिक्षणाचा अभाव होता. प्रशिक्षणाच्या अभावामुळे कर्मचाऱ्यांना क्षेत्रीय प्रकल्पावर काम करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. ही बाब लक्षात घेऊन कार्यकारी अभियंता गणेश नान्नोर, तसेच माजी उपविभागीय अधिकारी सुहास साळवे व वरिष्ठ लिपिक आनंद मूळक यांनी नारायणगाव येथे सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण सुरू होण्यासाठी मंत्रालय




स्तरापासून मोठी मेहनत घेतली. या सर्वांच्या प्रयत्नांना यश आल्याने नारायणगाव येथे नवनियुक्त कर्मचारी याना १ मे २०२६ पासुन प्रशिक्षण सुरू केले आहे. या प्रशिक्षण कालावधीत कर्मचाऱ्यांना जलसंपदा विभागाचे कायदे व नियमन १९७६ व २००५ चे जलसंपदा विभागाचे सर्व कायदे व त्यांची अंमलबजावणी , अभियांत्रिकी तत्वे व माहिती यामध्ये अभियांत्रिकी संकल्पना साहित्याचे गुणधर्म ,विविध प्रकल्पांची माहिती , देखभाल व दुरुस्ती, लेखा व कार्यपद्धती यामध्ये आस्थापना कामाचे स्वरूप तपशीलवार लेखी व हंगामाचा हिशोब विविध अहवाल तसेच सिंचन व्यवस्थापन मूलतत्त्वे व कार्यपद्धती सर्वसाधारण पद्धती आकारणी , मोजणी क्षेत्र व पाहणी , सिंचन क्षेत्राची मोजणी, प्रमाणबद्ध आकृत्या इत्यादी सर्व अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण दिले जात आहे. प्रशिक्षण कालावधीमध्ये व शिक्षणाचा एक भाग म्हणून प्रशिक्षणार्थींनी येडगाव धरण येथे भेट देऊन धरणाचे दरवाजे , विसर्ग नियंत्रण , विसर्ग पद्धत, धरणातील पाण्याची पातळी , साठा यांचे मोजणी यंत्र , पाणी सोडण्याची पद्धत त्यांची पाणी सोडण्याचे गेट, धरणाचा प्रकार, धरणाचे सर्व कार्य नियंत्रण याची प्रत्यक्ष स्थळावर जाऊन माहिती घेतली. तसेच मंगळूर पारगाव येथे डावा कालव्याला प्रत्यक्ष जाऊन पाहणी करण्यात आली. कालव्यातून वाहून जाणारे पाणी, अति वाहक , चाऱ्या , कालव्यातील भरावा, फॉल्स आउटलेट , चुट , चाऱ्या व पोटचाऱ्या यांची माहिती घेऊन , सिटीएफ ड्रे पाणी मोजण्याची यंत्रणा यांची पाहणी केली. औरंगपूर / पारगाव येथील पाणी वापर संस्थाना संस्थांना भेट देऊन संस्थेचे सर्व दप्तर व अभिलेखे यांची पाहणी केली. प्रशिक्षण कार्यशाळेसाठी कुठलाही शासकीय निधी नसताना उपविभागीय अधिकारी सुहास साळवे हे सर्व कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण मिळावे यासाठी मोठी मेहनत घेऊन प्रशिक्षण देत आहेत.

# कांदा दरवाढीसाठी केलेल्या रास्ता रोको आंदोलन प्रकरणी आंदोलकांवर गुन्हे दाखल

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम, यांच्यासह २०० ते २५० आंदोलकांविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** कांद्याला किमान २५ रुपये प्रतिकिलो हमीभाव, शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत आणि अन्य मागण्यांसाठी मंचर येथे झालेल्या रास्ता रोको आंदोलनानंतर मंचर पोलीस ठाण्यात आंदोलकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात चर्चेला उधाण आले आहे. मंगळवार, २ जून रोजी पुणे-नाशिक महामार्गावरील तांबडेमळा येथील नंदी चौकात शेतकरी व विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले होते. कांद्याच्या घसरलेल्या बाजारभावाविरोधात हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान काही काळ रस्ता रोखण्यात आल्याने महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून नागरिक, प्रवासी तसेच आपत्कालीन सेवांनाही याचा फटका बसल्याचा उल्लेख पोलिसांच्या फिर्यादीत करण्यात आला आहे. पोलीस कर्मचारी राजेश नलावडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम, तालुकाध्यक्ष धोंडिभाऊ भोर, युवक अध्यक्ष विशाल वाबळे, गणेश यादव, दिगंबर वाव्हळ, राहुल बहिरट, सीताराम म्हस्के यांच्यासह २०० ते २५० आंदोलकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, कांद्याच्या दरपडीत शेतकरी अडचणीत सापडल्याने सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन केल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास मंचर पोलीस करीत आहेत.



# बारामतीत वादळी पावसाचा तडाखा

## रेल्वे स्टेशन ते पेन्सिल चौक मार्गावर मोठी झाडे मुळासकट कोसळली, अनेकांच्या घरात पाणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती, दि. ५ :** बारामती शहरासह परिसरात झालेल्या जोरदार वादळी पावसाने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडवली. मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे रेल्वे स्टेशन ते पेन्सिल चौक या प्रमुख मार्गावरील अनेक मोठी झाडे मुळासकट उन्मळून पडली. त्यामुळे

> शहरातील सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले. अनेक रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचल्याने वाहनचालक व पादचाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. काही ठिकाणी घरांमध्ये आणि दुकानांमध्येही पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांचे नुकसान झाले. गटारी व नाले तुंबल्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण झाल्याचे चित्र अनेक भागांत दिसून आले.

काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. दुपारनंतर अचानक वातावरणात बदल होऊन काळे ढग दाटून आले. त्यानंतर सुरू झालेल्या वादळी पावसाने काही मिनिटांतच जोरदार रूप धारण केले. वेगवान वाऱ्यामुळे रस्त्यालगतची अनेक जुनी झाडे कोसळली. रेल्वे स्टेशन ते पेन्सिल चौक मार्गावरील पडलेल्या झाडांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला.



काही वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागला. दरम्यान, शहरातील अनेक सखल भागांमध्ये पावसाचे पाणी साचल्याने नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरले. घरांमध्ये पाणी घुसल्याने घरगुती साहित्याचे नुकसान झाले असून नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. काही ठिकाणी गटारी तुंबल्याने पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण झाला. घटनेची माहिती मिळताच नगरपरिषदेचे अधिकारी, अग्निशमन विभागाचे कर्मचारी आणि आपत्कालीन पथके घटनास्थळी दाखल झाली. पडलेली झाडे हटविण्याचे काम तातडीने हाती घेण्यात आले. तसेच पाणी साचलेल्या भागांतील परिस्थितीवरही प्रशासनाकडून लक्ष ठेवण्यात आले.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नसली तरी मोठ्या प्रमाणावर झाडे पडल्याने आणि घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. हवामान विभागाने पुढील काही दिवस पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## अत्रे प्रतिष्ठानचे साहित्य , पत्रकार व कलाकार पुरस्कार जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :-** आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदर व महाराष्ट्र साहित्य परिषद, सासवड शाखा यांच्या संयुक्त सहकार्याने ५७ वा स्मृतिदिन साजरा, करीत आहे. या दिवशी आचार्य प्र. के. अत्रे यांच्या स्मृति रसिकांसमोर सतत राहाव्यात या उद्देशाने आचार्य अत्रे 'साहित्य', आचार्य अत्रे 'पत्रकारिता' व आचार्य अत्रे 'कलाकार' पुरस्कार दिले जातात. या पुरस्काराचे हे ३६ वे वर्ष आहे.

या निमित्ताने दिल्या जाणाऱ्या आचार्य अत्रे पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे . यावर्षीचा आचार्य अत्रे ''साहित्य पुरस्कार'' मराठी



साहित्यातील ज्येष्ठ लेखक श्री .सुरेश आबासाहेब खोपडे यांना जाहीर झाला आहे. श्री खोपडे सनदी अधिकारी होते .त्यांनी विक्रमी खपाचे राम शाम शोध दरोडेखोरांचा हे पुस्तक लिहीले आहे. त्यांच्या या पुस्तकाच्या १७ आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. आचार्य अत्रे ''पत्रकारिता पुरस्कार'' दैनिक खबरदार पुढारीचे संपादक श्रीरामपूर तालुक्यातील पत्रकार श्री. दत्तात्रय पोपटराव खेमनर यांना जाहीर झाला आहे. श्री खेमनर हे भोंदूबाबा अशोक खरात यांच्या प्रकरणाची १ वर्षापूर्वी भांडे-फोड करणारे पत्रकार आहेत. तर आचार्य अत्रे ''कलाकार पुरस्कार'' ज्येष्ठ अभिनेते योगेश श्रीनिवास सोमण यांना जाहीर करण्यात आला आहे. त्यांचा गाजलेला 'अभंग तुकाराम' हा चित्रपट तसेच 'नांदा सौख्यभरे' आणि 'दिल्या घरी सुखी राहा' या लोकप्रिय मालिकांमधील त्यांच्या भूमिकांना प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली होती.

# धनकवडीतील त्या धोकादायक चेंबरची अखेर दुरुस्ती

## जेष्ठ समाजसेविका व युवा क्रांती संघटनेच्या वर्षाताई नाईक यांच्या पाठपुराव्यास यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वठे येमाई :** - पुण्याच्या धनकवडी परिसरातील पुण्याई नगर जवळील रुबी बेकारी नजीक नागरिकांसाठी धोकादायक ठरत असलेल्या मोठ्या चेंबरची अखेर दुरुस्ती करण्यात आली असून यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. युवा क्रांती पोलीस मित्र संघटनेच्या राष्ट्रीय महिला सह संपर्क प्रमुख व ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती वर्षाताई नाईक यांनी या प्रश्नी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे.त्यामुळे श्रीमती वर्षाताई नाईक यांचे अभिनंदन होत आहे. सदर चेंबर अनेक दिवसांपासून धोकादायक अवस्थेत होते. त्यामुळे पादचारी, दुचाकीस्वार तसेच लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मोठा अपघात होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात होती.या चेंबर जवळूनच




खोलवर ओढा देखील असल्याची माहिती श्रीमती नाईक यांनी दिली होती. या गंभीर समस्येबाबत विविध दैनिकातून देखील सातत्याने आवाज उठवून प्रशासनाचे लक्ष वेधले होते.ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती वर्षाताई नाईक यांनी संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा करत नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न लावून धरला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे आणि वृत्तपत्र व समाज माध्यमांच्या पाठपुराव्यामुळे प्रशासनाने तातडीने दखल घेत चेंबरची दुरुस्ती पूर्ण केली. पावसाळ्यापूर्वीच दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्याने पुण्याई नगर, धनकवडी परिसरातील नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात असून वर्षाताई नाईक यांचे अभिनंदन केले जात आहे. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे परिसरातून कौतुक होत आहे.नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वेळेत झालेली ही दुरुस्ती महत्त्वाची ठरली असून भविष्यात ही अशा समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रशासनाने अधिक संवेदनशीलपणे काम करण्याची अपेक्षा परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आळंदीत अभिवादन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आळंदी नगरपरिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या हस्ते हा अभिवादन सोहळा पार पडला. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. स्वराज्य स्थापनेसाठी केलेले त्यांचे योगदान आणि लोककल्याणकारी राज्यकारभार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, नगरसेवक रामचंद्र भोसले, सागर कुऱ्हाडे, सुरेश झोंबाडे, अनिकेत तापकीर यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.


### जाहिर नोटिस

तमाम लोकांस या नोटिसीव्दारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली गांव मौजे जळोची, ता. बारामती, जि. पुणे येथिल रत्ना जयंत शानबाग तर्फे कुलमूखत्यारधारक १) कस्तुरी अशोक राव व २) अर्पिता राजेंद्र टांकसाळे यांचे समाईक मालकीची संपुर्ण बिगरशेती प्लॉट मिळकत गट नं.८८/२/अ प्लॉट नं.१२ यांसी क्षेत्र ३.२०.४२ ही मिळकत आमचे अशिल यांना कायमखूषखरेदीने देण्याचे मान्य व कबूल केले असुन विसारादाखल रक्कम घेवून विसारपावती करून दिलेली आहे. आमचे अशिल यांनी सदरची मिळकत खरेदी घेणेची ठरवले आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा वर नमुद मिळकतधारक यांनी दिलेली आहे. सदर मिळकतीवर कोणाचेही बक्षीस, गहाण, दान, लीन, लीज, पोटगी, चोळी, बांगडी, खरेदी, साठेखत, करार-मदार, कूळवहीवाटी, विसारपावती इत्यादी कोणत्याही स्वरूपाचा हक्कसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसांचे आत लेखी आक्षेप मूळ कागदपत्रांनिशि खात्री पटवुन दयावी अन्यथा सदर मिळकतीत असे कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व नंतर कोणाचीही तकार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन : जिल्हा-पुणे तालुका-बारामती गाव- जाळोची बिगरशेती प्लॉट मिळकत गट नं.८८/२/अ प्लॉट नं.१२ यांसी क्षेत्र ३.२०.४२

यांसी चतुः सिमा - पुर्वेस - प्लॉट नं.११ व रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं.१३, पश्चिमेस - मार्केट यार्ड, उत्तरेस - प्लॉट नं.१.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली असे तारीख ०४/०६/२०२६

**ॲड. अमोल पोपट गावडे**
**पत्ता- ऑफिस नं.१०३, लॉयर्स एन्क्लेव्ह, नविन कार्टासमोर भिगवणरोड, बारामती, ता. बारामती, जि. पुणे.**
**मो.नं.८७८८७०७६३५**



### जाहिर नोटीस

**सासवड येथील मे. तहसिलदार पुरंदर यांचे न्यायालयात**
**क्र.हनो/एसआर/६६/२०२६**

**अर्जदार** - १) संतोष लक्ष्मण कोलते रा. पिसर्वे ता. पुरंदर जि. पुणे

**विरुध्द**

१) वेणुबाई शिवराम कोलते रा. पिसर्वे ता. पुरंदर जि. पुणे-**जाबदेणार**

मौजे पिसर्वे ता. पुरंदर येथील गट क्र. ४२५ मधील जाबदेणार यांचे नाव कमी होणेबाबत अर्जदार यांनी अर्ज करुन मागणी केलेली आहे. त्यानुसार इकडील नोटीस क्रमांक हनो/एसआर/६६/२०२६ अन्वये नोटीसा काढणेत आलेली आहे. जाब देणार यांना प्रकरणी उपस्थित राहणेबाबत सदरची जाहिर नोटीस देणेत येत आहे. जाब देणार यांना आपले म्हणणे मांडणेकामी दिनांक १७/०६/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता या न्यायालयात ते स्वतः अगर त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे मार्फत जातीने हजर राहणेसाठी बोलविण्यात येत असे.

तरी तुम्ही सर्व दस्तऐवज व आवश्यक कागदपत्रासह या न्यायालयात हजर राहणेचा आदेश देणेत येत आहे. उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास, तुमच्या गैरहजेरीत प्रकरणाची सुनावणी घेणेत येवुन गुणवत्तेवर निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी.

आज दिनांकः ४/०६/२०२६ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिली असे.

**(विक्रम राजपुत)**
**तहसिलदार पुरंदर**

द • ख • ल

## टाकळी लोणार सोसायटीच्या चेअरमनपदी सुभाष निकम : नाना काळे व्हा. चेअरमन

**लिंपणगाव :** टाकळी लोणार विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी सुभाष कदम तर व्हाईस चेअरमनपदी नाना काळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेचे



माजी चेअरमन हनुमंत रोडे व माजी व्हा. चेअरमन भीमराव जगदाळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदांसाठी निवड प्रक्रिया पार पडली. सहा. निबंधक यांच्या उपस्थितीत सभागृहात झालेल्या विशेष बैठकीत एकूण १३ पैकी १३ संचालक उपस्थित होते. सर्वानुमते सुभाष कदम यांची चेअरमनपदी तर नाना काळे यांची व्हा. चेअरमनपदी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. निवडीची घोषणा होताच उपस्थित संचालक व सभासदांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. या निवडणूक प्रक्रियेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक मुंडे यांनी चोख भूमिका बजावत निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व सुरळीतपणे पार पाडली. यावेळी संस्थेचे सचिव बबन शेळके यांनी त्यांना सहकार्य केले. निवड प्रक्रियेवेळी संस्थेचे संचालक मारुती भांडवलकर, सतीश गायकवाड, हनुमंत रोडे, भीमराव जगदाळे, राजेंद्र फंड, चंद्रकांत कदम, सुरेखा कुणगर, ताजुभाई शेख, कैलास मते, केशरबाई बुधवंत व नाना दरवडे यांच्यासह सर्व संचालक उपस्थित होते. नवनिर्वाचित चेअरमन सुभाष कदम आणि व्हा. चेअरमन नाना काळे यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी सर्व संचालकांना विश्वासात घेऊन काम करण्याची ग्वाही दिली. शेतकरी सभासदांचे हित जपणे, संस्थेची आर्थिक घडी अधिक मजबूत करणे व विविध विकासात्मक उपक्रम राबविण्यास प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## श्रीगोंद्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय सुरू करा; अन्यथा मुंबईत आंदोलनाचा इशारा

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात वाढत्या अवैध दारू विक्री, हातभट्टी आणि मद्य तस्करीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय तातडीने सुरू करण्यात यावे, अन्यथा मुंबई येथे राज्य उत्पादन शुल्क आयुक्त कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा स्वराज्य जनजागृती परिषदेचे जिल्हाध्यक्ष टिळक भोस यांनी दिला. यासंदर्भात भोस यांनी यापूर्वी ८ एप्रिल २०२५ रोजी अहिल्यानगर येथे लेखी निवेदन दिले होते. तसेच ५ ऑगस्ट २०२५ रोजी अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क कार्यालयासमोर ठिय्या आंदोलनही करण्यात आले होते. या मागणीसाठी वारंवार पाठपुरावा करण्यात आला असून, त्यांनी मुंबई येथे जाऊन राज्य उत्पादन शुल्क आयुक्त कार्यालय तसेच उपमुख्यमंत्री कार्यालयातही निवेदन सादर केले आहे. सध्या श्रीगोंदा, कर्जत आणि जामखेड तालुक्यांचा कार्यभार अहिल्यानगर येथील कार्यालयाकडून पाहिला जात आहे. मात्र भौगोलिक अंतर, अपुरे मनुष्यबळ आणि प्रशासनिक दुर्लक्ष यामुळे अवैध दारू व्यवसायावर प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप भोस यांनी केला आहे. तसेच शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याकडे लक्ष वेधले. दरम्यान, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे वार्षिक उत्पन्न सुमारे ३० हजार कोटी रुपये असताना मागील दोन वर्षांत राज्यात २४ नवीन कार्यालयांना मंजुरी देण्यात आली आहे. मात्र त्यापैकी एकही कार्यालय अद्याप सुरू झाले नसल्याची टीकाही भोस यांनी केली आहे.

## विधान परिषदेवर प्राजक्त तनपुरेंची निवड झाल्याबद्दल शिराळ येथे जल्लोष



**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील शिराळ येथे विधान परिषदेवर प्राजक्त तनपुरे यांची आमदार पदीबिनविरोध निवड झाल्याबद्दल शिराळ येथे ५१ तोफांची सलामी देऊन सरपंच रवींद्र मुळे यांनी जल्लोष केला. यावेळी सरपंच म्हणाले की, शिराळ्च्या विकास कामासाठी तनपूरे यांनी भरपूर निधी मंत्री असताना दिला. यापुढेही ते शिराळच्या विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी गावातील गणेश तुपे,रामदास गोरे, किसन दारकुंडे, गोरख नजन, दौलत बोरुडे, शिवाजी घोरपडे, पंढरीनाथ तुपे, अमीर शेख, शिवाजी तुपे, बाळू तागड, राजेंद्र घोरपडे, देविदास बुटे, बबन बोरुडे, बबलू तुपे व ग्रामस्थ उपस्थित होते.

## शहरटाकळी विद्यालयात शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात



**एरंडगांव :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा एफ.डी.एल. शिक्षण संस्थेच्या शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या अंजली चिंतामण होत्या. रामराज्यानंतर आदर्श राज्यकारभार हा छत्रपती शिवरायांनी केला. शिवराय हे रयतेचे राजे होते. त्यांनी रयतेची जिवापाड काळजी घेतली. हिंदवी स्वराज्याची स्वतंत्र ओळख जगाला व्हावी यासाठी त्यांनी ६ जून १६७४ रोजी रायगडावर राज्याभिषेक सोहळा पार पडला. शिवरायांच्या राज्यकारभाराचा आदर्श प्रत्येक विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी विद्यालयाची विद्यार्थिनी स्नेहा गायकवाड, ज्ञानेश्वरी मुंगसे, सृष्टी गवळी, कांचन गवळी, आयुष्य गायकवाड यांनी शिवरायांविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. विद्यालयाचे सहशिक्षक दिपक बोडखे यांनी आपल्या मनोगतातून शिवरायांच्या राज्यकारभाराची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. यावेळी व्यासपीठावर प्राचार्या अंजली चिंतामण, पोपट खताळ, उत्तमराव निकाळजे, बाळकृष्ण ठोंबळ, निसार शेख, किरण कुढेकर, शशिकांत सूर्यवंशी, ज्ञानेश्वर जाधव, अमोल गाडगे, अशोक भालेराव, सचिन गाडे, राहुल गायके, संतोष राऊत, सोनाली सुसे, आशा कानडे, रीना हांडे, निलोफ़र शेख व सर्व शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिनाथ काटे यांनी केले तर आभार अनिता दारकुंडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक बंधू भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

# बीड जिल्हा परिषदेवर रेडा आंदोलन

### मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान परिक्षणात अन्याय

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव :** राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानातील तालुकास्तरीय ग्राम पंचायत परिक्षणासाठी आलेल्या केज पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांच्या समिती कडून शेवगाव तालुक्यातील वाघोली येथील ग्रामपंचायतीवर अन्याय झाला आहे. गावाला माझी वसुंधरा अभियानासह विविध राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले असतांना देखील संबंधीत समिती व शेवगाव व केज पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी आर्थिक तडजोड करुन वाघोली गावास अपात्र ठरवले. या प्रकाराने संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी आज पुनर्रपरिक्षण करुन संबंधीत अधिकाऱ्यांचे निलंबन करावे, या मागणीसाठी बीड जिल्हा परिषदेसमोर रेडा आंदोलन केले.

शेवगाव तालुक्यातील वाघोली येथे गेल्या १० वर्षापासून वृक्षारोपन, जलसंधारण, अपारंपारीक उर्जास्त्रोताचा वापर, सेंद्रीय शेती याबाबत लोकसहभागातून मोठी चळवळ उभी राहीली आहे. ग्रामविकासाबरोबरच पर्यावरण संतुलनामध्ये श्रमदानातुन उभा केलेल्या कामामुळे राज्य सरकारने माझी वसुंधरा अभियानात राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार देवून सलग तीन वेळा गावाचा गौरव केला आहे. यावर्षीच्या मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानात देखील ग्रामस्थांनी गेल्या वर्षभरापासून नियोजन व तयारी केलेली असतांना देखील तालुकास्तरीय परिक्षण व पाहणीसाठी आलेल्या केज जि. बीड येथील गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे व समितीने मोठया प्रमाणावर आर्थिक तडजोड गावाला डावलत इतर गावांना पात्र ठरवले. संबंधीत सर्व ग्रामपंचायतीचे मिडीयासमोर मुद्यानुसार परिक्षण करण्यात यावे. यामागणीसाठी व प्रशासनाला जाग आणण्यासाठी शुक्रवार दि ५ रोजी बीड जिल्हा परिषदेसमोर रेडा आंदोलन करण्यात आले. बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हा परिषद कार्यालय असा निषेध मोर्चा काढत हे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात सरपंच सुश्मिता भालसिंग, उपसरपंच कल्पना भालसिंग, उमेश भालसिंग, भिमराज सागडे, शिवाजी भिसे, राजेंद्र आढाव, शंकर काटे, मंखळ पांढरे, बाळासाहेब देशपांडे ,बाबासाहेब गाडगे, राऊसाहेब शिंगटे, दत्तू दातीर, जगदीश जमधडे, संतोष आल्हाट, घनशाम वांढेकर, दगडू बोरुडे, अमोल शेळके, एकनाथ पवार, यांच्यासह ग्रामस्थ सहभागी झाले होते. याबाबत बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांना निवेदन देऊन आंदोलनाची सांगता करण्यात आली.

# श्रीगोंद्यात प्रथमच शिवराज्याभिषेक

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शनी चौक, श्रीगोंदा येथे छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त प्रथमच भव्य शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला अभिषेक करून हा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे नियोजन संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष शाम जरे यांनी केले. प्रारंभी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष प्रा. सुनील गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. सोहळ्यात प्रसिद्ध लेखक व व्याख्याते महेंद्र मिसाळ, प्रा. खरसडे आणि प्रा. सचिन झगडे यांनी उपस्थितांना शिवचरित्र, शिवविचार आणि स्वराज्याच्या संकल्पनेविषयी मार्गदर्शन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची प्रेरणा आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास छत्रपती संभाजी महाराज सेवा समितीचे जिल्हा उपाध्यक्ष आनंद लगड, माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे, संभाजी ब्रिगेडचे संतोष आरडे (मेजर), घनश्याम काळे, यशवंत सेनेचे संस्थापक अध्यक्ष आदेश शेंडगे, छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीचे सदस्य दीपक मखरे यांच्यासह विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तसेच शहरातील अनेक ज्येष्ठ नागरिक, शिवप्रेमी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. शिवराज्याभिषेकाच्या ऐतिहासिक स्मृतींना उजाळा देत स्वराज्य, सामाजिक एकता आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# कुकडी लाभ क्षेत्रात पाण्याचा मोठा आगडोंब

### अखेर कुकडीचे पाणी फक्त पिण्यासाठी व फळबागांसाठीच

नंदकुमार कुरुमकर। राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्याला वरदान ठरलेल्या कुकडी लाभक्षेत्रात उन्हाची तीव्रता अत्यंत भीषण स्वरूपात असून, या लाभक्षेत्रात पाणीसाठा संपुष्टात आल्याने मोठा आगडोंब सुरू आहे. त्यामध्ये उन्हाळी हंगामातील पिके कुकडीच्या उन्हाळी हंगामातील दुसऱ्या आवर्तनापासून वंचित राहिल्याने शेतकऱ्यांसमोर शेती पिकाबाबत मोठे जलसंकट उभे असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. दरम्यान उन्हाळी हंगाम संपला परंतु तरीदेखील उन्हाची तीव्रता अत्यंत भीषण आहे. पाऊस देखील लांबणीवर पडत आहे. त्यामध्ये २४ मे रोजी रोहिणी नक्षत्र सुरू झाले. परंतु या नक्षत्रात पावसाने कुठेच हजेरी न लावल्याने शेतकऱ्यांच्या काळजाचा ठोका मात्र वाढला जातो आहे. एकीकडे उन्हाच्या तीव्रतेमुळे विहिरी व कुपनलिका पाण्याअभावी कोरड्या पडल्या, दुसरीकडे उन्हाळी हंगामातील पिके पाण्याअभावी करपली गेली आहेत. त्यामध्ये कुकडीचे उन्हाळी हंगामातील दुसरे आवर्तन सुटेल, ही अपेक्षा शेतकऱ्यांना होती. परंतु जलसंपदा विभागाने या उन्हाळी हंगामातील आवर्तनाला कात्री लावली गेली आहे. जलसंपदा विभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार कुकडीचे आवर्तन २५ मे रोजी सुरू झाले आहे. परंतु सोडण्यात आलेले पाणी हे फक्त पिण्यासाठी आणि फळबागांसाठीच देण्याचा निर्णय झाल्याने शेतकऱ्यांमध्ये कुकडीच्या पाण्याबाबत घोर निराशा झाल्याच्या प्रतिक्रिया कुकडी लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांमधून व्यक्त केल्या जात आहेत.

दरम्यान उन्हाळी हंगामाची तीव्रता कमी होत नसल्याने आहे, त्या पाण्याचे देखील मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होत आहे. त्यामुळे कुकडी लागक्षेत्रात जनावरांच्या व पिकांच्या पाण्याचा प्रश्न मोठा ऐरणीवर येऊन ठेपला आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार कुकडीचे पहिले उन्हाळे हंगामातील आवर्तन फक्त चाऱ्या ओल्या करून आवर्तन बंद करण्यात आले. त्यामुळे पहिल्या आवर्तनाला देखील शेतकरी मुकले आता पुन्हा पिकांना उन्हाळी हंगामात पाण्याची गरज असताना जलसंपदा विभागाने शेतकरी विरोधी निर्णय घेत फक्त आवर्तन हे पिण्यासाठी व फळबागांसाठीच सोडण्यात येणार असल्याचे समजले.

## पाथर्डीच्या प्रथमनगराध्यक्षांनी सपत्नीक श्री रेणुका मातेची बांधली पुजा



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** अधिक मास व वाढदिवसाचे औचित्य साधून पाथर्डी येथील रेणुका परिवाराचे ज्येष्ठ सदस्य तथा पाथर्डीचे प्रथम नगराध्यक्ष सुभाष घोडके तसेच लोक नियुक्त प्रथम महिला नगराध्यक्षा जनाबाई घोडके या पति पत्नींनी श्री क्षेत्र अमरापूरच्या देवस्थानात श्री रेणुका मातेची शुक्रवारी (दि .५) मनोभावे पुजा केली. उभय पति पत्नी दरवर्षी ७ जूनला श्री क्षेत्र काशी येथे श्री काशी विश्वेस्वराच्या दर्शनाला जात असतात. श्री रेणुका माता देवस्थानचे प्रवर्तक ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. प्रशांत नाना भालेराव यांच्या उपस्थितीत देवस्थानात रेणुका मातेची पुजा बांधून काशीला प्रस्थान करण्यासाठी त्यांना निरोप देण्याची दरवर्षाची प्रथा आहे.

या वर्षी डॉ. भालेराव काही महत्वाच्या कामानिमित्त बाहेर असल्याने रेणुका परिवाराच्या वतीने डॉ. अरविंद पोटफोडे, प्रा. जनार्दन लांडे, बाळासाहेब चौधरी यांनी उभयतांचे स्वागत केले.

देवस्थानचे गुरु रमेश भोंग व विद्या भोंग यांनी पुजेचे पौरोहित्य करून औक्षण केले. यावेळी राज घोडके, अशोक शिरसाठ, नंदाताई गरड व अन्य भाविक उपस्थित होते.

# मुंगीत देशी दारूच्या दुकानास ग्रामस्थांनी ठोकले टाळे

रावसाहेब निकाळजे । राष्ट्र सह्याद्री



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील मुंगी येथील शासन मान्य असणारे देशी दारूचे दुकान हे गेली अनेक महिन्यापासून प्रत्येक सोमवारी आठवडी बाजारातच शासकीय जागेत सुरू असून त्याचा प्रत्येक आठवड्याला येणाऱ्या बाजारकरूंवर आणि विशेष करून महिलाना मोठा त्रास होत आहे. शासकीय जागेत असलेले देशी दारूचे दुकान तात्काळ इतरत्र हलवावे अशी मागणी मुंगी ग्रामपंचायतीने बोलावण्यात आलेल्या ग्रामसभेमध्ये करण्यात आली. यावेळी त्यावर लगेचच सर्व ग्रामस्थानी जाऊन कुलूप ठोकण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला. ग्रामसभेतील सर्व ग्रामस्थांनी शासकीय जागेत असलेल्या देशी दारू दुकानाला टाळे ठोकले. शासन मान्य असलेले हे देशी दारूचे दुकान आठवडी बाजारातच सुरू असून ते तेथून स्थलांतरित करण्यात यावे अशी मागणी अनेक महिन्यापासून नागरिकांकडून करण्यात येत होती. जिल्हा परिषदेच्या शाळेसमोर १ मे रोजीची होणारी ग्रामसभा ज्या वेळी घेण्यात आली त्यावेळी त्या सभा कोरम कमी असल्याने ती सभा स्थगित करण्यात आली होती. मात्र ती सभा घेणे ग्रामपंचायतीला बंधनकारक असल्याने शनिवारी लोकनियुक्त सरपंच सौ. ललीता ढमढेरे यांचे अध्यक्षते खाली सभा पार पडली. या सभेमध्ये ग्रामविकास अधिकारी आर.आर.राठोड यांनी सभेपुढील सर्वविषयांचे वाचन करून प्रत्येक विषयाबाबत त्यांनी माहिती दिली.

माजी सरपंच राजेंद्र ढमढेरे यांनी उपस्थित ग्रामस्थांना सूचित केले की, इतर वादग्रस्त विषयांवर चर्चा करण्याऐवजी गावच्या विकास कामावर जरूर विषय मांडा असे सांगितल्यानंतर उपस्थित असलेल्या असंख्य तरुणांनी पुढे येत बाजार तळात सुरू असलेले देशी दारूचे दुकान शासकीय जागेतून हटवण्यात यावे. अशी मागणी केली असता त्यास उपस्थित सर्वच ग्रामस्थानी टाळ्या वाजवून पाठींबा दिला. आताच्या आता लगेच आपण सर्वजण जाऊन त्या दुकानाला कुलूप लावू अशी मागणी समोर येताच ग्रामसभेनंतर अनेक ग्रामस्थ बाजारतळाकडे गेले व दुकानदारास सर्व सामान दुकानातून बाहेर काढण्यास भाग पाडले. त्यानंतर दुकानास टाळे ठोकले आहे.

या वेळी भाऊसाहेब घोटाळे, दिगंबर बल्लाळ,विनोद घोरपडे, ज्ञानेश्वर घोरपडे, मिलिंद पाटील गायकवाड, गणेश देशमुख, लक्ष्मण देवढे, गुलाब गव्हाणे, कारभारी खरात, सुदर्शन सरोदे, महेश घोटाळे यांच्यासह असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

# हंगेवाडी, बोरी परिसरात वादळी वाऱ्याचा तडाखा

### डाळिंब बागांचे प्रचंड नुकसान ; शेतकरी संकटात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा : तालुक्यातील हंगेवाडी, बोरी आणि परिसरात काल झालेल्या मुसळधार पाऊस व तीव्र वादळी वाऱ्यामुळे डाळिंब पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, हाताशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने डाळिंब उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. विशेष म्हणजे प्रशासनाने या घटनेची तातडीने दखल घेत महसूल व कृषी विभागाच्या माध्यमातून पंचनामे सुरू केले आहेत.**



वादळाचा सर्वाधिक फटका हंगेवाडी आणि बोरी परिसरातील डाळिंब उत्पादकांना बसला आहे. सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे संचालक भाऊसाहेब कोळपे, दत्तात्रय धायगुडे, मोहन श्रीराम धायगुडे, भरत दत्तात्रय धायगुडे, योगेश दत्तात्रय धायगुडे, विजय धायगुडे, सचिन इधाते, कुंडलिक इधाते आणि विठ्ठल रायकर या शेतकऱ्यांच्या डाळिंब बागांचे अतोनात नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की, अनेक बागांमधील डाळिंबाची झाडे मुळासकट उन्मळून पडली, तर अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून फळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सध्या डाळिंबाची फळे काढणीच्या अंतिम टप्प्यात असताना आलेल्या या वादळामुळे मोठ्या प्रमाणावर फळगळ झाली असून जमिनीवर डाळिंबाचा खच पडला आहे.

झाडांवर शिल्लक राहिलेल्या फळांनाही एकमेकांवर घास लागल्याने डाग पडले असून बाजारमूल्यावर त्याचा परिणाम होणार आहे. डाळिंब पिकासाठी शेतकऱ्यांनी औषध फवारणी, खते, मशागत आणि पाणी व्यवस्थापनासाठी लाखो रुपयांची गुंतवणूक केली होती. अनेकांनी बँका तसेच खासगी सावकारांकडून कर्ज घेऊन बागा उभ्या केल्या होत्या. मात्र काही मिनिटांच्या वादळाने वर्षभराचे कष्ट अक्षरशः मातीमोल केले. आभाळानेच शेतकऱ्यांच्या ताटातील घास हिसकावून नेला, अशी भावना परिसरातील शेतकरी व्यक्त करत आहेत. दरम्यान, प्रशासनानेही तत्परता दाखवत नुकसानग्रस्त भागात पाहणी सुरू केली आहे.

तलाठी महेंद्र शिंदे आणि कृषी विभागाच्या कृषी सहाय्यक गायकवाड मॅडम यांनी आज सकाळपासूनच बाधित शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीचे पंचनामे सुरू केले आहेत. बाधित शेतकऱ्यांचे नुकसान अत्यंत मोठे आहे. प्रत्येक शेतात प्रत्यक्ष जाऊन वस्तुनिष्ठ नोंद घेतली जात आहे. पंचनामे तात्काळ सुरू करण्यात आले असून एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल. सविस्तर अहवाल लवकरच वरिष्ठांकडे पाठवला जाईल, अशी माहिती तलाठी महेंद्र शिंदे व कृषी सहाय्यक गायकवाड मॅडम यांनी दिली. प्रशासनाच्या तत्परतेबद्दल शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असले, तरी आता शासनाने कोणतीही तांत्रिक दिरंगाई न करता बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात थेट आणि तातडीने भरपाई जमा करावी, अशी मागणी भाऊसाहेब कोळपे व ग्रामस्थांनी केली आहे. वादळ गेलं पण शेतकऱ्यांच्या डोळ्यातला पाऊस अजून थांबलेला नाही, अशी हळहळ परिसरात व्यक्त होत आहे.

## तिसगाव-पैठण रस्ते प्रकल्पातील निकृष्ट कामांची चौकशी करा; अन्यथा १५ जूनला आंदोलन



### नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवकांचे तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर :** तिसगाव-पैठण एच पी सी, एच ए. एम, रस्ते प्रकल्पामध्ये सुरू असलेल्या निकृष्ट, नियमबाह्य व सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या कामांची तात्काळ चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा १५ जूनला तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेवगाव नगरपालिकेच्या नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवकांनी दिला आहे.

याबाबत शेवगाव तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. तिसगाव-पैठण रस्ते प्रकल्पामध्ये अनेक ठिकाणी तयार करण्यात आलेल्या रस्त्याला तडे गेलेले दिसून येत आहेत. तसेच कॉंक्रीट रस्त्याच्या कामासाठी आवश्यक असलेला क्युरिंग पिरियड पूर्ण होण्यापूर्वीच घाईगडबडीत पुढील पी. क्यु. सी. कॉंक्रीटचे काम करण्यात आले आहे. यामुळे कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून भविष्यात रस्त्याचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. या प्रकरणाची सखोल तांत्रिक चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर योग्य ती कार्यवाही न केल्यास १५ जूनला तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. यावेळी शिवसेना नेते अरुण मुंढे, उपनगराध्यक्ष ताहेर पटेल, नगरसेवक आशुतोष डहाळे, हरीश भारदे, सुनील काकडे, वजीर पठाण, नंदकुमार मुंढे, अमर पुरनाळे, रोहित काथवटे, प्रवीण भारस्कर, राहुल मगरे, बाबासाहेब लांडे, कैलास तिजोरे, साईनाथ आधाट, संतोष जाधव, जाकीर कुरेशी तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
रविवार दि.७ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# गर्भलिंग निदान रॅकेट...१९ वा आरोपी श्रीगोंद्यातून जेरबंद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : लोणी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अवैध गर्भलिंग निदान चाचणी व बेकायदेशीर गर्भपात प्रकरणाच्या तपासात पोलिसांना आणखी एक मोठे यश मिळाले असून या गुन्ह्यातील आणखी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणातील अटक आरोपींची संख्या आता १९ झाली आहे.

या गुन्ह्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात नेवासा येथील डॉ. भणगे, दोन एजंट व सहा कुटुंबीय अशा नऊ जणांना अटक करण्यात आली होती. त्यांच्याकडून एक पोर्टेबल सोनोग्राफी मशीन व तीन चारचाकी वाहने जप्त करण्यात आली होती. पुढील तपासात विविध जिल्ह्यांतून आणखी आरोपींना अटक करण्यात आली.

श्रीरामपूर येथील डॉ. कुटे व डॉ. शेख यांच्यासह पुण्यातील दोन डॉक्टर आणि वैद्यकीय साहित्य पुरवठादारालाही पोलिसांनी जेरबंद केले. तपासादरम्यान पुण्यातील मेडिकल साहित्य पुरवठादार नरेंद्र ठाकरे याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार श्रीगोंदा तालुक्यातील घोगरगाव येथील मेडिकल चालक जालिंदर रामदास बोरुडे (वय ४०) याचा शोध सुरू होता. अटकेची चाहूल लागल्याने तो गेल्या दहा-बारा दिवसांपासून फरार होता. अखेर श्रीगोंदा तालुक्यातील आरडगाव परिसरातील शेतातील झोपडीत लपून बसलेल्या बोरुडेला पोलिसांनी ताब्यात घेतले.

त्याच्याकडून अवैधरित्या वापरले जाणारे सोनोग्राफी मशीन व क्रेटा चारचाकी वाहन जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणात आतापर्यंत सहा डॉक्टर, तीन मेडिकल चालक आणि एक मोठा वैद्यकीय साहित्य पुरवठादार अटकेत आहेत. तसेच पाच सोनोग्राफी मशीन व चार वाहने जप्त करण्यात आली आहेत. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# अवैध वाळू वाहतुकीवर वीरगाव पोलिसांची कारवाई

## १०.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : तालुक्यात अवैधरित्या सुरू असलेल्या वाळू वाहतुकीविरोधात वीरगाव पोलिसांनी धडक कारवाई करत १० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई ३१ मे रोजी रात्री सुमारे ११.३० वाजेच्या सुमारास पुरणगाव-बाभूळगाव चौफुली परिसरात करण्यात आली.

पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे संबंधित ठिकाणी सापळा रचून कारवाई केली. यावेळी अवैधरित्या वाळूची वाहतूक करणारा हायवा ताब्यात घेण्यात आला. कारवाईदरम्यान १० लाख रुपये किमतीचा हायवा तसेच २५ हजार रुपये किमतीची वाळू असा एकूण १० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलिस अंमलदार चंद्रकांत बावचे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कपिल संजय महाजन (वय २७, रा. कोकमठाण, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर) याच्याविरोधात वीरगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात पोलिसांनी कारवाईची मोहीम सुरू ठेवली असून, अशा बेकायदा प्रकारांना आळा घालण्यासाठी पुढील काळातही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास वीरगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक भिवसने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# इतिहास संशोधक, ज्येष्ठ पत्रकार भूषण देशमुख यांचे निधन


**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : महाराष्ट्रातील समर्पित इतिहास संशोधक, ज्येष्ठ पत्रकार आणि स्नेहालय संस्थेचे संस्थापक सदस्य भूषण गोपाळ देशमुख यांचे शनिवारी दुपारी २ वा. मेंदू विकारावर उपचार घेताना खासगी रुग्णालयात निधन झाले. ते ६३ वर्षांचे होते. सायंकाळी ६.३० वा. त्यांच्या पार्थिवावर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. गुजरात मधील अमदाबाद येथे ७ जुलै १९६३ रोजी जन्मलेल्या श्री .देशमुख यांचे पितृछत्र १९७१ मध्ये हरपले .

त्यानंतर आईच्या वडिलांकडे ,आजोळी त्यांचे शालेय शिक्षण जामखेड ( जि. अहिल्यानगर) येथील ल ना होशिंग विद्यालयात झाले. पुणे येथील फर्गुसन महाविद्यालय आणि त्यानंतर अभियांत्रिकी महाविद्यालयातून ते टेक्स्टाईल इंजिनिअर झाले.

मुलत: इतिहास संशोधन, लेखन आणि माध्यम क्षेत्राची त्यांना अत्यंत आवड होती. सोलापूर येथील दैनिक संचार , नगर मधील दैनिक सार्वमत आणि दैनिक समाचार येथे उपसंपादक म्हणून त्यांनी काम केले.. १९८६ पासून दै. केसरी, दै.लोकसत्ताच्या अहिल्यानगर आवृत्तीत त्यांनी वरिष्ठ उपसंपादक म्हणून काम केले. वर्ष २०१४ नंतर दैनिक दिव्य मराठी या वृत्तपत्रात पत्रकार म्हणून त्यांनी काम केले. महाराष्ट्रातील सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांवरील सखोल लिखाणासाठी ते प्रसिद्ध होते. १९८९ साली स्नेहालय संस्थेच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता . संस्थेचे विश्वस्त म्हणून दोन दशके त्यांनी काम पाहिले. वर्ष २००८ मध्ये स्नेहालय तर्फे रेडिओ नगर ९०.४ एफ एम हे समुदाय रेडिओ केंद्र ( कम्युनिटी रेडिओ स्टेशन ) सुरू करणे त्यांनी पुढाकार घेतला . अहिल्यानगर ( पूर्वीच्या अहमदनगर ) शहराच्या तसेच महाराष्ट्राच्या इतिहास आणि संस्कृतीबद्दल भूषण यांचा गाढा व्यासंग होता.

गेली ५ वर्षे दर रविवारी नगर मधील तसेच बाहेरून येणाऱ्या पर्यटकांसाठी ते हेरिटेज वॉक च्या माध्यमातून विनमूल्य नगर परिसरातील सर्व ऐतिहासिक ठिकाणे दाखवत आणि त्यांची माहिती देत. नगरमधील शाळा आणि महाविद्यालयांमधून गेली दोन दशके ते सातत्याने ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रश्नमंजुषा, निबंध आणि चित्रकला स्पर्धांचे आयोजन भूषण करीत आले. नगर मधील महापुरुषांच्या वास्तुंवर निल फलक लावण्याच्या उपक्रमातही त्यांचा



पुढाकार होता. अहमदनगरच्या प्रसिद्ध भुईकोट किल्ल्याचे नूतनीकरण आणि सुशोभीकरण करण्याच्या शासनाच्या उपक्रमात डॉक्टर पी. अनबलगंन जिल्हाधिकारी असताना त्यांनी मार्गदर्शक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली.

नगर दर्शन हे नगरच्या इतिहासावरील त्यांचे पुस्तक प्रसिद्ध आहे. अहिल्यानगर जिल्हा वस्तुसंग्रहालयाच्या कामातही तसेच मोडी लिपी प्रशिक्षण उपक्रमात ही त्यांचे योगदान होते. भारतीय लष्करातील काही प्रमुख लोकांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना नगरच्या भुईकोट किल्ल्याची माहिती देण्यासाठी २२ एप्रिल रोजी भूषण गेले होते. यावेळी त्यांना विषारी सापाचा दंश झाला. त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले.

उपचार सुरू असतानाच त्यांना व्हेंटिलेटर आणि डायलिसिस यांची गरज पडली. डॉ. पाठक आणि स्वास्थ्य हॉस्पिटलच्या टीमने मेहनत घेऊन त्यांना उपचार दिले. १५ मे पर्यंत उपचार घेऊन ते घरी परतले. दि. २८ मे रोजी त्यांना श्वसन घेण्यास त्रास झाला. रुग्णालयात नेले असता हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यानंतर मेंदूला ऑक्सिजनचा पुरवठा आणि रक्तपुरवठा कमी झाल्याने मेंदूचे कार्य मंदावले. एका आठवड्याच्या उपचारानंतर आज त्यांची प्राणज्योत मालवली.

नगर शहर आणि जिल्ह्यातील सर्व पत्रकार, पत्रकारांच्या संघटना, स्नेहालय - अनामप्रेम - हिवरे बाजार येथील यशवंत ग्रामीण विकास संस्था - नवजीवन रावसाहेब पटवर्धन स्मारक- अहमदनगर एज्युकेशन सोसायटी - जिल्हा संग्रहालय इ. सर्व सामाजिक संस्था आणि संघटना तसेच इतिहास संस्कृती आणि पर्यावरण प्रेमीं तर्फे भूषण यांना भावपूर्ण श्रद्धांजली ...

### इतिहास क्षेत्राची मोठी हानी : ना. विखे पाटील

ज्येष्ठ पत्रकार, इतिहास अभ्यासक व लेखक भूषण गोपाळ देशमुख यांच्या निधनाने जिल्ह्याने एक अभ्यासू पत्रकार, संशोधक आणि संवेदनशील लेखक गमावला असल्याची भावना जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी व्यक्त केली. अहिल्यानगरचा इतिहास, सांस्कृतिक वारसा आणि निजामशाही कालखंडाचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. त्यांनी सुरू केलेला 'हेरिटेज वॉक' उपक्रम नव्या पिढीला इतिहासाशी जोडणारा ठरला. इतिहास संशोधन, लेखन आणि सांस्कृतिक जतन क्षेत्रातील त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील, असे सांगत विखे पाटील यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# खोकर येथे चोरीचे सत्र पशुपालक चिंतेत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील खोकर येथे गोठ्यात बांधलेले शेळया बोकड चोरून नेण्याचा प्रकार घडला आहे.या परिसरात चोरीचे सत्र सुरूच असल्याने पशुपालकामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहेत.

याबाबत अक्षय पोपट पवार, (रा.खोकर ) श्रीरामपूर तालुका पोलिसांना दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, घटनेच्या दिवशी नेहमीप्रमाणे रात्री दहा वाजता जेवण करून आपण झापलो गेलो होतो.तत्पूर्वी आपण पाळलेल्या शेळया,बोकड हे गोठ्यामध्ये बांधलेल्या होत्या.

सकाळी ते सात दरम्यान नेहमीप्रमाणे उठल्यानंतर शेडमध्ये आवरण्यासाठी गेलो असता शेडमध्ये बांधलेल्या ३ शेळ्या व १ बोकड त्या याठिकाणी नसल्याचे आढळून आले.त्यामुळे आजूबाजूच्या परिसरात शेळ्या व बोकडचा शोध घेतला, मात्र ते आढळून आले नाहीत.त्यामुळे या एकूण २८ हजारांच्या ३ शेळया आणि ७ हजारांचा एक बोकड असा ३५ हजारांचे शेळया, बोकड अज्ञात चोरटयाने चोरून नेल्याचे घटना घडली असे फिर्यादीत म्हटले आहेत.

या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.पुढील तपास श्रीरामपूर तालुका पोलीस करीत आहेत.

# पारनेर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन प्रक्रियेतील दिरंगाई

## आमदार दातेंनी घेतली दखल



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर** : पारनेर तालुक्यातील हिवरे कोरडा येथील रमेश बाबासाहेब शेळके यांच्या निधनानंतर त्यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पारनेर येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला होता.

मात्र तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या पारनेर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन प्रक्रियेस होत असलेल्या विलंबामुळे नातेवाईकांसह उपस्थित नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे परिस्थिती अधिक गंभीर बनत असल्याची माहिती मिळताच पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. काशिनाथ दाते यांनी तातडीने ग्रामीण रुग्णालयात धाव घेत परिस्थितीची पाहणी केली.

सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणीच्या वेळी तत्परतेने धाव घेऊन प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून देणारी आमदार काशिनाथ दाते सरांची कार्यशैली यावेळी पुन्हा एकदा दिसून आली. त्यांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे संबंधित प्रक्रिया वेगाने मार्गी लागली असून उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस तालुका उपाध्यक्ष प्रितेश पानमंद यावेळी उपस्थित होते.

जनतेच्या प्रश्नांवर तत्काळ प्रतिसाद देणे आणि प्रशासनाला जबाबदार धरणे, हीच आमदार काशिनाथ दाते यांच्या लोकाभिमुख नेतृत्वाची खरी ओळख असल्याची भावना यावेळी नागरिकांमधून व्यक्त करण्यात आली.

# विधान परिषदेतील माघारीवरून आघाडीत नाराजी नाट्य

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : राज्यभरात सध्या विधान परिषद निवडणुकीचे नाट्य रंगात आले असतानाच, आता महाविकास आघाडीतील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर येऊ लागल्या आहेत. पुणे आणि नाशिक स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून मविआने घेतलेल्या माघारीवरून राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू आहेत. त्यातच आता, मतांची बेरीज नसेल तर कशाला लढायचे, असं म्हणणारे सुद्धा आमच्यात आहेत, असा खोचक टोला काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांचे नाव न घेता लगावला आहे. यामुळे उमेदवारी मागे घेण्यावरून मविआमध्ये अंतर्गत नाराजी असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी विधान परिषद निवडणुकीतील वाढत्या भ्रष्टाचारावर थेट बोट ठेवले होते. त्या म्हणाल्या, सध्याच्या विधान परिषद निवडणुकीमध्ये कोणतीही रंगत दिसत नाही. लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकीप्रमाणे यात लोकशाहीचा उत्साह नाही, तर प्रचंड प्रमाणावर घोडेबाजार सुरू आहे. हाच घोडेबाजार होणार हे स्पष्ट असल्यामुळेच पुणे विधान परिषदेच्या निवडणुकीतून महाविकास आघाडीने माघार घेतली आहे. सुप्रिया सुळे यांच्या या विधानामुळे राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली होती. खासदार सुळे यांच्या या विधानानंतर नाशिकमध्ये काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी मविआची बाजू मांडताना सुळे यांच्या भूमिकेवर अप्रत्यक्ष आक्षेप घेतला. थोरात म्हणाले की, महाविकास आघाडीत माघारीनंतर नाराजी नाटक आहे. मात्र, लोकशाहीला अभिप्रेत नसलेल्या मार्गावर अवलंबून भाजपाने अनेकांना माघार घ्यायला लावल्याचे दिसून आलंय. मतांची बेरीज नाही तर कशाला लढायचे? असे म्हणणारे सुद्धा आमच्यात आहे, असे त्यांनी म्हटले. थोरातांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. नाशिकच्या जागेवरून मविआने उमेदवार न देण्याबाबत बोलताना थोरात म्हणाले की, नाशिकमध्ये उमेदवार न देण्यामागे महाविकास आघाडीची बैठक झाली असेल आणि काहीतरी रणनीती ठरली असेल, असे त्यांनी म्हटले. तसेच, नाशिकमधल्या महायुतीत विधान परिषदेबद्दल जो काही गोंधळ आहे. त्यात नेमका कोणा-कोणाला पाठिंबा द्यायचा असा महायुतीतला मोठा गोंधळ असल्याचे देखील त्यांनी म्हटले.

# सलून सेवांच्या दरात २० टक्के वाढ

## ६ जूनपासून नवे दर लागू



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नगर** : वाढती महागाई, इंधन दरवाढ, सलून साहित्याच्या किंमतींमध्ये झालेली वाढ आणि व्यवसायावरील आर्थिक ताण लक्षात घेऊन महाराष्ट्र नाभिक महामंडळाने राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील सलून सेवांच्या दरात २० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही दरवाढ ६ जून २०२६ पासून लागू करण्यात आली असल्याची माहिती महामंडळाचे राज्याध्यक्ष सयाजी झुंजार यांनी दिली.

महामंडळाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या काही वर्षांपासून सलून व्यवसाय वाढत्या खर्चाच्या ओझ्याखाली दबला गेला आहे. इंधन दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढल्याने शॅम्पू, हेअर कलर, ब्लीच, फेशियल क्रीम, जेल, वॅक्स, निर्जंतुकीकरण साहित्य तसेच विविध डिस्पोजेबल वस्तूंच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे. लॉरियल, वेला, श्वाईझकॉफ आणि गोदरेजसारख्या कंपन्यांनीही त्यांच्या उत्पादनांच्या दरात वाढ केली आहे.

मात्र ग्राहकांना परवडावे म्हणून सलून व्यावसायिकांनी दीर्घकाळ जुनेच दर कायम ठेवले होते. नाभिक महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, सलून व्यवसाय हा अनेक कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रमुख आधार आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत ग्राहकांना सेवा देताना व्यावसायिकांना घरखर्च, मुलांचे शिक्षण, दुकानभाडे, वीजबिले, कर आणि कर्जाचे हप्ते यांसारख्या वाढत्या खर्चाचा सामना करावा लागत आहे.

विशेषतः ग्रामीण भागातील सलून व्यावसायिकांची परिस्थिती अधिक कठीण झाली आहे. दुकानांचे आधुनिकीकरण व नूतनीकरण करण्यासाठी घेतलेल्या कर्जांवरील वाढते व्याजदर, स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर आणि परवाना शुल्क यामुळे आर्थिक ताण अधिक वाढल्याचे प्रदेश उपाध्यक्ष विष्णू वखरे यांनी नमूद केले.

दरवाढ ही व्यावसायिकांची मजबुरी असून निवड नसल्याचे स्पष्ट करत राज्याध्यक्ष सयाजी झुंजार यांनी ग्राहकांनी या निर्णयाकडे केवळ अतिरिक्त खर्च म्हणून न पाहता हजारो नाभिक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाशी संबंधित प्रश्न म्हणून पाहावे, असे आवाहन केले. सलून व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही महामंडळाचे कार्याध्यक्ष श्याम आस्करकर, सरचिटणीस घनश्याम वाघ, कोषाध्यक्ष रामदास पवार आणि चिटणीस विकास मदने यांनी केले आहे.

# जांभळे तोडल्याने दोन मित्रांना मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : जांभळे तोडल्याच्या कारणावरून आरोपींनी सिद्धार्थ गांगुर्डे व त्याच्या मित्रांना शिवीगाळ करुन लाकडी काठी व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. ही घटना दि. ३१ मे रोजी दुपारच्या वेळी राहुरी तालुक्यातील चांदेगाव येथे घडली.

घटनेतील सिध्दार्थ सुनिल गांगुर्डे, वय १९ वर्षे, रा. चांदेगाव, ता राहुरी, या तरुणाने राहुरी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, दि. ३१ मे २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास साई संतोष भांड व सागर संतोष भांड हे चांदेगाव येथील जांभळीच्या बागेत जांभळी तोडण्यासाठी गेले. त्यावेळी त्या दोघांनी सिद्धार्थ गांगुर्डे व त्याचे मित्र ओम बाबासाहेब कुठुळे, ओमकार प्रभाकर सिनारे, रा. चांदेगाव, यांना जांभळी तोडण्यासाठी बोलाविले. त्यांच्या सांगण्यावरुन दहा ते बारा जांभळे तोडले. त्यावेळेस आरोपी तेथे आले.

त्यांनी सिद्धार्थ गांगुर्डे व त्याच्या मित्रांना शिवीगाळ करुन लाकडी काठी व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. तसेच तुम्ही पुन्हा या ठिकाणी दिसले तर तुम्हाला बंदुकीने गोळ्या घालु, अशी धमकी देऊन ते निघुन गेले. घटनेनंतर सिध्दार्थ सुनिल गांगुर्डे याने राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी राजेंद्र कृष्णाजी भांड, रा. टाकळीभान, ता. श्रीरामपुर, अजित सुभाष भांड, रा. चांदेगाव तसेच राजेद्र भांड यांचा मामा अशा तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

# व्यापाऱ्याचा चोरीस गेलेला सोयाबीनचा ट्रक मुद्देमालासह जप्त !

## स्थानिक गुन्हे शाखेची राजगुरुनगर मध्ये कारवाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी येथील व्यापारी प्रदीप शिवनारायण भट्टड (रा. स्वस्तिक चौक, राहुरी) यांचा चोरीस गेलेला सोयाबीन मालासह सुमारे ३२ लाख रुपये किंमत असलेला ट्रक ड्रायव्हरने फसवून चोरला होता.

त्यानंतर व्यापारी श्री भट्टड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गु.र. नं. ५२१/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१६(४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली पो.उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, भगवान थोरात, रमीजराजा आतार, विशाल तनपुरे यांचे विशेष पथक तयार करण्यात आले. गुप्त बातमीदाराच्या माहितीवरून हा ट्रक राजगुरुनगर (ता. खेड, जि. पुणे) येथील मार्केटयार्डमध्ये उभा असल्याचे समजताच पथकाने तात्काळ कारवाई करत ट्रक ताब्यात घेतला आहे. या कारवाईत १५ लाख रुपये किमतीचा आयशर ट्रक आणि १५,३९,६४८ रुपये किमतीचे महाबीज कंपनीचे सोयाबीन बियाणे असा एकूण ३०,३९,६४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.